१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, रविवार १ मार्च, २०२६ • वर्ष-१०३, अंक-३५६, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 103, Issue - 356 Marathi - Daily - Mumbai, 1 March, 2026 Page- 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
तिसरं महायुद्ध सुरू?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# तिसरे महायुध्द सुरू! ट्रम्पची दादागिरी! इस्रायलचा इराणवर हल्ला

# इराणचेही प्रत्युत्तर! आखातातील ८ देशांतील अमेरिकी तळांवर हल्ले




**आज पहाटे इस्रायलने इराणवर जबरदस्त बॉम्ब हल्ले करून तिसरे महायुध्द सुरू केले. इराणचे खोमेनी सरकार पायउतार करून इराणची अणुशस्त्र पूर्ण नेस्तनाबूत केल्याशिवाय आता अमेरिका थांबणार नाही, अशी दादागिरीची भाषा करीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणला चेतावनी दिली की, अमेरिकेशी शत्रुत्व घेणे किती महागात पडते हे तुम्हाला आता कळेल. ट्रम्पने हा इशारा दिल्यानंतरही इराणने माघार घेतली नाही. उलट आखाती देशातील कतार, अबूधाबी, जॉर्डन, ओमान, बाहरीन, रियाध, कुवैत, वेस्ट बँक वर तुफानी हल्ले चढवले. या भागात जवळजवळ ८० लाख भारतीय वास्तव्यास आहेत. त्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.**



## ट्रम्प यांचा इशारा! शरण या!

इराणवर हल्ला सुरू केल्यानंतर देशाला संबोधित करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, इराणच्या दहशतवादी सरकारकडे कधीही अणुअस्त्र असू देणार नाही यावर मी ठाम आहे. आम्ही याआधी इराणवर हल्ले करून त्यांचे आण्विक तळ उद्ध्वस्त केले. पुन्हा अणुअस्त्र उत्पादनाचा प्रयत्न करू नका, असे आम्ही त्यांना बजावले, पण त्यांनी ऐकले नाही. इराणकडून अमेरिकन नागरिकांना धोका होऊ शकतो. इराणने सतत आपल्या विरोधात धोरण ठेवले. इराक, बेरूत, मध्य पूर्व येथील अमेरिकन तळांवर सतत हल्ले केले. आता आम्ही हे सहन करणार नाही. इराणच्या पाठिंब्याने हमासने इस्रायलवर हल्ले करून अनेकांना ठार केले. त्यात अमेरिकनही ठार झाले. आम्ही त्यांच्याशी करार करण्याचा प्रयत्न अनेकवेळा केला. पण त्यांनी लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे उत्पादित करणे सुरू केले. त्यामुळे युरोपातील आपले तळ आणि शेवटी थेट आपल्या देशाला धोका निर्माण झाला. आता आपण त्यांच्यावर हल्ला सुरू केला आहे. अमेरिकेशी दोन हात करू नये हे त्यांना आता कळेल.

या हल्ल्यात त्यांची आण्विक शक्ती पूर्ण नष्ट करणार आहे. यात अमेरिकन शहीद होतील, पण हे आपल्या राष्ट्रासाठी आहे. मी इराणला ताकीद देतो की, त्यांनी पूर्ण शरणागती पत्करावी. इराणच्या जनतेला मी आवाहन करतो की, घरी सुरक्षित राहा. इराणच्या सत्ताधाऱ्यांपासून मी तुम्हाला मुक्त करणार आहे.

■ तेहरान

**गेले** काही महिने अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत चाललेल्या तणावाचा आज उद्रेक झाला. आज सकाळी सर्वप्रथम इस्रायलने इराणवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यास सुरुवात केली. इराणची राजधानी तेहरानसह इस्फहान, कराज, करमानशाह, क्योम आदि शहरांवर इस्रायलने असंख्य क्षेपणास्त्र हल्ले केले. काही वेळाने अमेरिका या हल्ल्यात सहभागी झाला. अमेरिकेने ऑपरेशन एपिक फ्युरी आणि इस्रायलने सिंहगर्जना या नावाने इराण विरोधात युद्ध छेडले. त्यानंतर इराणने अमेरिका आणि इस्रायलला क्षेपणास्त्रांचा मारा करत चोख प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली. इस्रायलसह अमेरिकेचे लष्करी, हवाई, नौदल तळ असलेल्या आखाती देशांवर इराणने हल्ले केले.

इराणवर हल्ला केल्यास इराण प्रत्युत्तर देणार हे गृहित धरून इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी देशवासीयांना संबोधित करत युद्ध सुरू झाल्याची माहिती दिली. लोकांना सुरक्षित स्थळी आश्रय देण्याचे आवाहन केले. शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली. देशभरात धोक्याचा इशारा देण्यासाठी सायरन वाजू लागले. इस्रायलकडे ७० हजार सैनिक असलेले अतिरिक्त सैन्यदल आहे. या अतिरिक्त सैन्य दलालाही राजधानी तेल अवीवमध्ये तैनात करण्यात आले.

इराणने आखाती देशांमध्ये जिथे जिथे अमेरिकेचे लष्करी तळ आहेत अशा कुवैत, बाहरीन, जॉर्डन, ओमान, कतार, वेस्ट बँक, अबूधाबी आदि देशांवर हल्ले केले. जॉर्डनमधील मुअफ्फक अल-सल्ती, कुवैतमधील अली अल सलेम, कतारमधील अल उदैद आणि युएईमधील अल धफ्रा या अमेरिकेच्या हवाई तळांवर इराणने क्षेपणास्त्र हल्ले केले. बहरिनमधील फिफ्थ फ्लिट या अमेरिकन नौदलाच्या मुख्यालयावरही इराणने हल्ला केला. या युद्धाच्या परिस्थितीमुळे बहुतांश आखाती

» पान ८ वर

## ब्लॅकबॉक्समधील डाटा रेकॉर्डर उष्णतेमुळे जळाला! अजित पवार अपघात अहवाल

■ मुंबई

**दिवंगत** अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताचा प्राथमिक चौकशी अहवाल आज विमान अपघात तपास संस्थेने (एएआयबी) जाहीर केला. त्यामध्ये ब्लॅकबॉक्समधील फ्लाईट डाटा रेकॉर्डर अति उष्णतेमुळे जळाला. मात्र रॉ डाटा डाऊनलोड करण्यात यश आले, असे एएआयबीने म्हटले.

२२ पानांच्या या प्राथमिक अहवालात विमानाला अपघात होण्यापर्यंतचा घटनाक्रम देण्यात आला आहे. अपघात झाला तेव्हा २ हजार मीटर दृष्यमानता होती. दोन्ही वैमानिकांना बारामती विमानतळावर विमान उतरवण्याचा अनुभव होता. दोन्ही वैमानिकांची ब्रेथ ॲनलायझर टेस्ट निगेटिव्ह आली होती. विमान कोसळण्याआधी एका झाडावर धडकले, असे अहवालात म्हटले

एएआयबीच्या तपास पथकाने घटनास्थळी पाहणी करून हा अपघात घडताना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या लोकांशी संवाद साधला. अपघात स्थळी आढळलेल्या विमानाच्या अवशेषांची छायाचित्रे अहवालासोबत जोडली आहेत. धावपट्टीच्या सुरुवातीला ५० मीटर बाहेर विमान कोसळले, असे अहवाल सांगतो. वैमानिक आणि एअर ट्रॅफिक कंट्रोल यांच्यामध्ये अपघाताच्या दिवशी सकाळी ८ वा. १९ मिनिटे व २५ सेकंदापासून ८ वा.४४ मिनिटे व १३ सेकंदांपर्यंत वैमानिक व बारामती एटीसी यांच्यात झालेल्या संवादाचे रेकॉर्डींग आहे. शेवटचा संवाद ओ शिट, ओ शिट असा आहे.

## गिरणी कामगारांना लवकरच घरे मिळतील! फडणवीसांचे आश्वासन


■ मुंबई

**गिरणी** कामगारांच्या घरांचा प्रश्न पुन्हा एकदा विधान भवनात गाजला. उबाठाचे आमदार सुनील प्रभू यांनी गिरणी कामगारांना घरांची जोरदार मागणी करत सरकारला सवाल केला. यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गिरणी कामगारांच्या घरांच्या संदर्भात आतापर्यंत १३ हजार ४५३ सदनिकांचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मुंबई परिसरात गिरणी कामगारांसाठी मोठी गृहनिर्माण योजना मंजूर झाली असून, लवकरच तिचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या योजनेतून मोठ्या प्रमाणात घरे उपलब्ध होतील. केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपड्यांच्या प्रश्नाबाबतही सरकार प्रयत्नशील आहे. काही ठिकाणी ना-हरकत प्रमाणपत्र मिळाले असून, उर्वरित ठिकाणी ते मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## बाळासाहेबांच्या अटकेसाठी भुजबळांचा दबाव 'ट्रबल शूटर'मध्ये पोलीस अधिकारी रघुवंशींचा दावा

■ मुंबई

**माजी** दहशतवादविरोधी पथक पोलीस प्रमुख के. पी. रघुवंशी हे त्यांच्या 'ट्रबल शूटर' या पुस्तकामुळे पुन्हा चर्चेत आले आहेत. पुस्तकात त्यांनी आपल्या सेवाकाळातील अनेक संवेदनशील घटनांवर भाष्य करत तत्कालीन राजकीय व्यवस्थेवर गंभीर आरोप केले आहेत. विशेषतः हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अटक करण्यासाठी भुजबळांकडून राजकीय दबाव टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यांनी दबावापुढे




झुकण्यास नकार दिला आणि त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले, असे त्यांचे म्हणणे आहे.

के. पी. रघुवंशी यांचा दावा आहे की, त्यांना त्यांच्या कारकिर्दीत बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अधिकारी इंद्रेश कुमार यांना अटक करण्यास सांगण्यात

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

आले होते. १९९३ च्या मुंबई दंगलीनंतर स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल सादर करण्यात

» पान २ वर

**वाचकांसाठी सूचना**

दि. ०१.०३.२०२६ पासून दैनिक **'नवाकाळ'ची** सर्व दिवसांकरिता किंमत रु. ७ करण्यात आली आहे याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**
**दै.नवाकाळ**

## अजितदादा सदैव आपल्या स्मरणात सुनेत्रा पवारांनी लगेच पोस्ट हटवली

■ बारामती

**उपमुख्यमंत्री** अजित पवार यांच्या निधनाला आज एक महिना पूर्ण झाला. त्या निमित्ताने अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी भावनिक व्हिडिओ पोस्ट केला होता. या व्हिडिओत त्यांनी अजित पवार यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेत ते सदैव स्मरणात राहतील, अशी भावना व्यक्त केली होती. हा व्हिडिओ पोस्ट झाल्यानंतर काही वेळातच व्हायरल झाला. मात्र व्हिडिओ काही वेळातच एक्सवरून दिसेनासा झाल्याने तो व्हिडिओ सुनेत्रा पवारांनी का हटवला? याची चर्चा रंगली. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले होते की, जिवाभावाचा माणूस, माणुसकीची खोल जाण, काम करण्याची अखंड प्रामाणिक तळमळ व समाजासाठी झटण्याची अविरत वृत्ती हेच दादांचे खरे व्यक्तिमत्त्व होते.

## पोर बेवारस राहिली असती! पत्नी अजून आजारी कंपनीने कळवले नाही! पिंकीचे वडील कळवळले

■ मुंबई

**बारामती** येथे एक महिन्यापूर्वी २८ जानेवारीला भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमानातील सहा क्रू सदस्यांचाही मृत्यू झाला होता. यात मुंबईतील वरळी येथे राहणारी केबिन अटेंडंट पिंकी माळी हिचा मृत्यू झाला. आज या अपघाताला एक महिना झाला तेव्हा त्याबद्दल बोलताना पिंकीचे वडील शिवकुमार माळी दुःखाने अक्षरशः कळवळले. ते म्हणाले की, माझ्या मुलीच्या मृत्यूची अधिकृत माहिती



कंपनीकडून मिळालेली नाही. अजूनही कंपनीकडून काहीही संपर्क नाही. त्या अपघाताची बातमी मी टीव्हीवर पाहिली आणि आम्ही माझ्या मुलीचा मृतदेह घेण्यासाठी बारामतीला गेलो. मला तिचा मृत्यू झाल्याचे अधिकृत कुणीही कळवले नाही. मी जर स्वतः बारामतीला गेलो नसतो तर माझी मुलगी तिथे बेवारस ठरली असती. काल तिच्या मृत्यूचा दाखला घेण्यासाठीही पुन्हा बारामतीला गेलो होतो.

ते पुढे म्हणाले की मुलीच्या निधनाच्या धक्क्यातून माझी पत्नी अद्याप सावरलेली नाही. तिच्यावर अजूनही दादर येथील सुश्रुषा

» पान २ वर

## ब्रीच कॅण्डी रुग्णालयात आशिष शेलार-पवार भेट

■ मुंबई

**सांस्कृतिक** मंत्री आशिष शेलार यांनी आज सकाळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. मुंबईतील ब्रीच कॅण्डी रुग्णालय येथे शेलार यांनी पवार यांची भेट घेतली.

२२ फेब्रुवारी रोजी शरद पवार यांची प्रकृती अचानक बिघडली होती. त्यांना उलट्या सुरू झाल्याने डिहायड्रेशनचा त्रास झाला होता. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी असून, त्यांच्यावर रुबी हॉल क्लिनिक येथे उपचार सुरू होते. डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेतल्यानंतर बुधवारी सकाळी त्यांची प्रकृती स्थिर झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले. नियमित तपासणीसाठी आज शरद पवार मुंबईतील ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल झाले होते. आशिष शेलार यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेत प्रकृतीची चौकशी केली.

**पारसी झोरोष्ट्रीयन युथ फॉर नेक्स्ट जनरेशनने (झेडवायएनजी) प्रकाशित केलेल्या नव्या कॅलेंडरवरून पारशी समाजामध्ये वाद निर्माण झाला आहे. पारसी झोरोष्ट्रीयन समाजातील अनेकांनी या कॅलेंडरला कडाडून विरोध केला आहे. कॅलेंडरमधील मजकूर अश्लिल आणि राजकीय हेतूने प्रेरित आहे, असा आक्षेप समाजातील अनेकांनी घेतला आहे.**

## पारसी झोरोष्ट्रीयनच्या कॅलेंडरला समाजातील अनेकांचा आक्षेप

■ मुंबई

**झेडवायएनजी** ही युवकांची संघटना बॉम्बे पारसी पंचायत (बीपीपी) या पारसी झोरोष्ट्रीयन समुदायातील सर्वोच्च संस्थेच्या अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. कॅलेंडरवर पारसी तरुणींची काही छायाचित्रे आहेत. या तरुणींना आधुनिक पेहरावात दाखवण्यात आले आहे.

या छायाचित्रांवर समाजातील अनेकांनी आक्षेप घेतला आहे. ही उत्तान छायाचित्रे पारसी धर्मातील पवित्र परंपरांचा भंग करणारी आणि अश्लिलतेला प्रोत्साहन देणारी आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. काहींनी या कॅलेंडरचा संबंध पारसी पंचायतच्या



आगामी निवडणुकीशी जोडला आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या बीपीपीच्या निवडणुकीवर डोळा ठेवून सवंग लोकप्रियतेसाठी काहींनी कॅलेंडरचा वापर केला आहे, अशी टीका केली.

## पोर्शे प्रकरणात डॉ. तावरेला सुप्रीम कोर्टाकडून जामीन

■ पुणे

**पोर्शे** अपघात प्रकरणाशी संबंधित रक्त नमुना छेडछाड प्रकरणात अटक करण्यात आलेल्या डॉ. अजय तावरेला सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. याप्रकरणी झालेल्या सुनावणीत समानतेच्या तत्त्वाचा आधार घेत न्यायालयाने दिलासा दिला. या प्रकरणातील इतर तीन आरोपींना यापूर्वीच जामीन मंजूर केला.


कल्याणी नगर परिसरात मे महिन्यात झालेल्या भीषण पोर्शे अपघातात १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने कार चालवत दुचाकीला धडक दिल्याने दोन जणांचा मृत्यू झाला होता. अपघातावेळी चालक मद्यधुंद असल्याचा आरोप करण्यात आला होता. याशिवाय अपघातानंतर आरोपी अल्पवयीन चालकाच्या रक्त नमुन्यांमध्ये छेडछाड केल्याचाही आरोप झाला होता. वैद्यकीय तपासावेळी आरोपी चालक मुलाचे रक्त घेऊन नंतर ते बदलून त्याच्या आईचे रक्त ठेवण्यात आले.

## चेंबूरमध्ये इमारतीवरून कामगार कोसळले! १ ठार! पाच जखमी

■ मुंबई

**चेंबूरमधील** सुभाषनगर परिसरात बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत आज सकाळी मोठी दुर्घटना घडली. सुभाषनगर रोड नंबर १५ वरील इमारत क्रमांक ३६ च्या सहाव्या मजल्यावर पार्किंग लिफ्टची भिंत बांधताना सहा कामगार कोसळले.

रामल्लू (५५) याचा जागीच मृत्यू झाला, तर गुणाधर राय (२२), उसराई राय (३०), रमेश राय (२५), विजय राय (३५) आणि संदीप (२७) हे पाच कामगार गंभीर जखमी झाले आहेत. जखमींपैकी गुणाधर रायची प्रकृती चिंताजनक असून त्याला



सायन रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल केले. उर्वरित ४ जखमींवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नगरसेविका आशा मराठे यांनी महापौर रितू यांच्यासह घटनास्थळी भेट दिली आणि विकासकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.





# राज्याचे अर्थचित्र बदलणार का ?

>>> रविवार विशेष

**महाराष्ट्रातील विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले असून येत्या ६ मार्च रोजी पुढील वर्षासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मांडण्यात येणार आहे. यावेळचा अर्थसंकल्प सादर करण्यासाठी अजितदादा पवार असते तर नवा विक्रम नोंदवला गेला असता; पण नियतीला ते मान्य नसावे. यंदा मुख्यमंत्री फडणवीस हे अंदाजपत्रक सादर करणार असल्याने त्याला एक वेगळे महत्त्व आहे. दावोसमधील गुंतवणुकींनंतर महाराष्ट्राच्या वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीला बूस्टर मिळाला असला तरी राज्यावर एकूणच कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. हे कर्ज कमी कसे होईल या दिशेने अर्थमंत्री कोणती पावले टाकतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**



**मोहन एस. मते,** मुक्त पत्रकार

राज्य शासनाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी पासून सुरू झाले आहे. ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री सादर करणार आहेत. त्याअगोदर प्रथेप्रमाणे महाराष्ट्राचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल विधिमंडळात मांडला जातो. ज्याप्रमाणे आर्थिक सर्वेक्षण आणि अर्थसंकल्प मांडणे ही एक औपचारिकता असते. संपूर्ण आर्थिक वर्षाचा खर्च आणि उत्पन्नाचा अंदाज अर्थसंकल्पात घेतला जातो. तर आर्थिक सर्वेक्षणामध्ये संपलेल्या वर्षात राज्याची स्थिती काय होती, कुठल्या क्षेत्रामध्ये किती उत्पादन झालं, कोणते क्षेत्र विकसित झालं, अशा अनेक गोष्टींचा आढावा घेतला जातो. सर्वसमावेशक, गतिमान आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र उभारण्याचा सरकारचा निर्धार राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणात व्यक्त करण्यात आला आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' चा संकल्पही नव्याने सांगण्यात आला आहे. आर्थिक आघाडीवर राज्याने देशात आघाडी कायम राखली असल्याचे सांगताना २०२४-२५ महाराष्ट्रात १.६४ लाख कोटी रुपयाची थेट परकीय गुंतवणूक झाली असून ती देशातील एकूण परकीय गुंतवणुकीच्या ३९ टक्के आहे. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत ९१ हजार कोटीहून अधिक गुंतवणूक झाली आहे.

## भांडवली खर्चात कपात

राज्यावरील गेल्या पाच वर्षातील कर्जाचे प्रमाण पाहता ते वाढत गेलेले आहे. २०२०-२१ मध्ये ५ लाख १९ हजार कोटी, २०२१-२२ ५ लाख ७६ हजार कोटी, २०२२ -२३ मध्ये ६ लाख २९ हजार कोटी, २०२३-२०२४ मध्ये ७ लाख ११ हजार कोटी, २०२४ -२०२५ मध्ये ८ लाख ३९ हजार कोटी, २०२५-२६ मध्ये ९ लाख ३२ हजार कोटी अंदाजीत आहे. त्याचप्रमाणे एकूण महसुली जमेच्या खर्चाच्या टक्केवारीचा विचार करता २०२४-२५ मूळ अर्थसंकल्प ९२ हजार ७७९ कोटी, २०२४-२५ १३ टक्के सुधारित अर्थसंकल्प १ लाख ९ हजार कोटी, २०२५-मध्ये ९३ हजार १६५ कोटी, २०२५-२६ ११ टक्के वरील टक्केवारीचा विचार होत असताना वरील टक्केवारीचा विचार होत असताना मागील खर्चात भांडवली खर्चासाठी १३ टक्के तरतूद करण्यात आली होती; परंतु २०२५ -२६ च्या आर्थिक वर्षात ही तरतूद ११ टक्के करण्यात आलेली आहे. याचाच अर्थ विकास कामावरील खर्चात दोन टक्के घट होईल. विशेष म्हणजे भांडवली खर्च वाढवून विकास कामांना प्राधान्य देण्यावर सरकारचा भर असतो. केंद्र सरकारने भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ केली असून राज्यानेही याच वाटेवरुन जात मालमत्ता वाढवण्यावर भर द्यावा, अशी सूचना पंतप्रधानांनी केली आहे.

आज राज्याच्या भांडवली खर्चात कपात झाल्याने विकास कामावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेकदा भांडवली खर्चासाठी शासनाकडे पुरेसा निधी नसल्याने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात क्षेत्रात खाजगीकरणाचा पर्याय स्वीकारावा लागतो.

राज्यावरचा वाढता कर्जाचा डोंगर ही बाब गांभीर्याने लक्षात घेणे गरजेचे आहे. अगदी रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेत राज्य सरकार हे विशिष्ट मर्यादेपर्यंत कर्ज घेऊ शकत असले, तरी हे कर्ज कमी करण्याच्या दिशेने सुद्धा राज्याची वाटचाल झाली पाहिजे. कारण ऋण काढून सण साजरी करणे हे फारसे कठीण नसते; परंतु कोणत्याही ऋणातून मुक्त होणे हे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र देशाचा आर्थिक आधार आहे. या राज्याला कर्ज काढण्याची वेळ यायलाच नको. उलट राज्याने स्वयंपूर्णता मजबूत केली पाहिजे, ही या राज्यातील जनतेची अपेक्षा आहे. एवढेच नव्हे तर इतरांना कर्ज देण्याची क्षमता महाराष्ट्र सरकारने वाढविली पाहिजे. कर्जाच्या तुलनेमध्ये प्रत्यक्ष विकास कामावर होणारा खर्च हा पुरेसा ठरत नाही. प्रशासन आणि अनुत्पादक कारणासाठी बराच मोठा खर्च होतो हे देखील वस्तूस्थिती आहे.

**जानेवारी २०२६ मध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम दावोस येथे १८ देशातील कंपन्यांबरोबर सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले असून त्यातून ४० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र २०४७ अंतर्गत राज्याची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवून व्हिजन मॅनेजमेंट स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्र उद्योग गुंतवणूक व सेवा धोरण २०२५ द्वारे ७०.५० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० लाख थेट रोजगाराचे लक्ष्य निश्चित केले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे.**

## प्रकल्पांवरचा वाढता खर्च

मागील वर्षात विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विकास कामांना प्राधान्य देण्यात आले होते. त्यातून भांडवली खर्च वाढविण्यात आला. पण ठेकेदारांची बिले वाढत गेली आहेत. विकास कामासाठी करण्यात आलेल्या तरतुदींएवढा निधी मिळतोच असे नसते. शासकीय खर्चात कपात करताना भांडवली खर्चावर मर्यादा येते. आजच्या स्थितीमध्ये अर्थसंकल्पामध्ये खर्चाच्या अंदाजाबरोबर नव्या वर्षातले काही संकल्प मांडले जातात; परंतु वर्षभरात त्यापैकी किती संकल्पांची पूर्तता होते, याचाही विचार होणे गरजेचे आहे. बरेचदा अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली तरी हा निधी पूर्णपणे खर्च होत नाही. एखाद्या प्रकल्पासाठी कालावधी निश्चित केला जातो आणि त्यासाठी रक्कम राखून ठेवली जाते. पण तो प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण होत नाही. स्वाभाविकपणे विलंब झाल्याने या प्रकल्पांचे खर्च दुपटी-तिपटींनी वाढतच राहतात. अर्थसंकल्प हा प्रशासनाच्या किंवा राज्यकारभाराच्या व्यवस्थेचा एक भाग असतो आणि ती औपचारिकता पूर्ण करणे आवश्यक ठरते. अनेकदा तर अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या रकमेपेक्षा १०-१५ पट अतिरिक्त खर्च प्रकल्पांवर झाल्याची उदाहरणे राज्याने पाहिली आहेत. या प्रकारांना आळा बसायला हवा. कारण शेवटी हा जनतेचा पैसा आहे.

## विकास दराचे काय?

राज्याचा विकासदर ७.३% असल्याचा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त करण्यात आला होता. आर्थिक सर्वेक्षण हे अनेक दृष्टीने राज्याच्या विकासासाठी आणि समाजाच्या कल्याणकारी योजनांसाठी मूलभूत स्वरूपाचे असते. त्या सर्वेक्षणातून हाती येणाऱ्या माहितीचा किती प्रमाणात विधायक किंवा सकारात्मक उपयोग होतो याचा देखील गांभीर्याने विचार व्हायला हवा.


आताच्या सर्वेक्षणामधील राज्यावर असलेला एकूणच कर्जाचा वाढता डोंगर याचा विचार करता भविष्यकाळात हे कर्ज कमी कसे होईल या दिशेने पावले पडणे त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना व अंमलबजावणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या वर्षात आधीच्या सर्वेक्षणात गृहीत धरलेला आवश्यक विकासदर राज्याला गाठता आलेला नाही. याचा विचारही अंदाजपत्रक सादर करताना व्हायला हवा. स्व. अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनामुळे यावेळचा राज्याचा अर्थसंकल्प स्वतः मुख्यमंत्री सभागृहात मांडणार आहेत. संपूर्ण राज्याचे या अर्थसंकल्पाकडे लक्ष लागलेले आहे. महाराष्ट्राचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल आणि त्यानुसार अर्थसंकल्प याचा ताळमेळ महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाचा, सर्व घटकांना न्याय देणारा आणि सर्वसामान्यांना सोबत घेऊन जाणारा, जनतेला महिला भगिनी शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला, बेरोजगार युवकांना हा अर्थसंकल्प न्याय देणारा ठरेल अशी अपेक्षा आहे. ●●●

## कर्जाचा वाढता बोजा

● अर्थसंकल्प सादर करताना कोणाही अर्थमंत्र्यांपुढे सर्वांत मोठे आव्हान असते ते म्हणजे महसुली जमेची बाजू आणि कर्जाचा बोजा यांचा ताळेबंद मांडणे. राज्यावरील कर्जाचा बोजा २०२६-२७ आर्थिक वर्षाच्या अखेरीस ९ लाख ३२ हजार कोटींवर जाईल असा अंदाज मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात व्यक्त करण्यात आला होता. त्या कालावधीत राज्याने १ लाख २१ हजार कोटींचे कर्ज काढले होते. त्यामुळे राज्यावरील कर्जाचा बोजा वाढत चाललेला आहे.

● स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्जाचे प्रमाण हे २५ टक्क्यांच्या मर्यादेत असावे, असे निकष केंद्र सरकार व रिझर्व्ह बँकेने निश्चित केले आहेत. महाराष्ट्राचे हे प्रमाण त्यावेळेला १८.५२ टक्के असल्याने कर्ज काढण्यावर राज्यकर्त्यांचा भर असतो. कारण २०२४-२०२५ चा अर्थसंकल्प सादर करताना राज्यावरील कर्जाचा बोजा हा ७ लाख ८२ हजार कोटी होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात कर्जाचा बोजा हा ८ लाख ३९ हजार कोटींवर गेला.

● मागील निवडणूक वर्षात विविध योजनांसाठी कर्ज काढण्यात आले होते.



यातून कर्जाचा बोजा वाढत गेला. तसेच स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात हा बोजा जवळपास १९ ते २० टक्के होण्याचा अंदाज आहे.

● मागील अर्थसंकल्पांच्या आकारमानाचा विचार करता महसुली जमा ५ लाख ६०हजार ९६४ कोटी रुपये आणि महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपये, म्हणजेच ४५ हजार ८९१ कोटी महसुली तुटीचा, राज्याचा आतापर्यंतचा सर्वाधिक तुटीचा अर्थसंकल्प होता.

# एकात्मतेचा 'रंग'सोहळा



**अंजली महाजन,** कला-संस्कृती अभ्यासक



भारतीय संस्कृतीतील सण - उत्सवांची संरचना ही मानवी अस्तित्वाच्या विविध स्तरांना स्पर्श करणारी आहे. फाल्गुन मासातील पौर्णिमेला साजरा होणारा होळी हा उत्सव याचे मूर्तीमंत उदाहरण. वरवर पाहता हा सण केवळ रंगांची उधळण आणि मौजमजेचा वाटत असला, तरी त्यामध्ये दडलेला समाजशास्त्रीय, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक विचार मौलिक आहे. मानवी मनातील क्लेष, निसर्गातील बदल आणि सामाजिक एकात्मता या तिन्ही पातळ्यांवर होळीचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते.

गेल्या काही वर्षांमध्ये सांस्कृतिक सरमिसळीमुळे महाराष्ट्रातही होळीच्या दिवशी रंगोत्सव साजरा होतो. साधारण १०-१५ वर्षांपूर्वी फाल्गुन पौर्णिमेला होलिकोत्सव, त्याच्या दुसऱ्या दिवशी धुळवड आणि रंगपंचमीच्या दिवशी रंगांची उधळण केली जात असे. पण आता उत्तरेकडील परंपरांप्रमाणे होळी आणि धुळवड यांना अधिक महत्त्व आले असून रंगपंचमी बिचारी झाकोळली गेली आहे.



गावाखेड्यात नसलं तरी महानगरांमध्ये ही स्थिती प्रकर्षाने दिसते. अर्थात यामुळे या सणांचा लौकिकार्थ आणि महत्व तसूभरही कमी होत नाही.

## पौराणिक कथांचा मतितार्थ

होलिका दहनामागे जी पौराणिक कथा सांगितली जाते, दैवी चमत्काराची नसून मानवी अहंकाराच्या पतनाची आणि शुद्ध भक्तीच्या विजयाची गाथा आहे.असुराजधिपती हिरण्यकश्यपू हा अत्यंत अहंकारी राजा होता. त्याने स्वत:लाच देव मानले होते, मात्र त्याचा मुलगा प्रल्हाद हा भगवान विष्णूचा परम भक्त होता. प्रल्हादाची भक्ती पाहून क्रोधीत झालेल्या हिरण्यकश्यपूने त्याला मारण्याचे अनेक प्रयत्न केले. शेवटी त्याने आपली बहीण होलिका हिला मदतीला बोलावले. होलिकेला अग्नीपासून सुरक्षित राहण्याचे वरदान लाभले होते. प्रल्हादाला मांडीवर घेऊन ती चितेवर बसली, जेणेकरून प्रल्हाद जळून खाक होईल. परंतु, प्रल्हादाच्या भक्तीमुळे होलिकेकडील संरक्षक वस्त्र उडून प्रल्हादावर आले आणि होलिका मात्र त्या आगीत भस्मसात झाली. या घटनेची आठवण म्हणून वाईट विचारांचे आणि नकारात्मकतेचे दहन करण्यासाठी 'होळी दहन' करण्याची परंपरा सुरू झाली. हिरण्यकश्यपूने स्वतःला ईश्वराच्या स्थानी बसवण्याचा जो अट्टाहास धरला, तो त्याच्या विनाशाचे कारण ठरला. शक्तीचा वापर जेव्हा अनिष्ट हेतूंसाठी केला जातो, तेव्हा वरदानही शापात रूपांतरित होऊ शकते. होलिकोत्सवाचा हाच खरा संदेश असून आपल्यातील ईर्ष्या, द्वेष आणि अहंकार यांसारख्या राक्षसी प्रवृत्तींचे दहन केल्याशिवाय मनाची शुद्धी होणे अशक्य आहे.

## गोकुळातील होळी

याच सणाशी जोडलेली दुसरी कथा भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांच्यातील निखळ प्रेमाची. गोकुळात सुरू झालेली रंगांची ही प्रथा सावळ्या आणि गोऱ्या रंगातील द्वैत मिटवून मानवी मनाला एकाच रंगात न्हाऊ घालण्याची प्रेरणा देते. ब्रजभूमीतील होळी आजही जगप्रसिद्ध आहे. पुतना वधाचा संदर्भ असो वा कामदेवाचे आत्मबलिदान, प्रत्येक कथा ही अनिष्टाचा नाश करून शुभ्र आणि सात्त्विक विचारांच्या स्थापनेचा पुरस्कार करते. रघु राजाच्या काळात धुंधी राक्षसिणीला मुलांनी आवाजाच्या जोरावर पळवून लावल्याची कथा आजही आपल्याला सामूहिक शक्तीच्या महत्त्वाची जाणीव करून देते.

## बाह्य रंग पुसणारा उत्सव

अनादी काळापासून होळी हा सण चालत आला आहे. निसर्गात होणारा बदल आणि हिवाळ्याची सांगता होऊन वसंताची चाहूल लागली की, होळीचे आगमन होते. 'वाईटावर चांगल्याचा विजय' हे या सणाचे मुख्य सूत्र आहे. या काळात लोक जुने हेवेदावे विसरून एकमेकांना क्षमा करतात आणि नात्यांमधील ओलावा पुन्हा नव्याने जिवंत करतात. रंग, संगीत, नृत्य आणि पक्वान्नांची मेजवानी यामुळे हा सण जात-पात, धर्म आणि सामाजिक स्तर या पलीकडे जाऊन सर्वांना एकाच रंगात रंगवून टाकतो. या सर्वसमावेशकतेमध्येच होळीचे सांस्कृतिक महत्त्व दडलेले आहे. हा सण कोणत्याही एका वर्गाचा किंवा जातीचा उरलेला नाही. चेहऱ्यावर रंगांचा थर चढला की माणसाचे बाह्य रूप पुसले जाते आणि उरतो तो केवळ एक माणूस. हीच या उत्सवाची खरी सामाजिक फलश्रुती आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सामाजिक स्तरावर अनेक भेदाभेदांच्या भिंती आहेत; पण होळी हे सर्व भेद विरघळवून टाकणारे एक रसायन म्हणून काम करते. 'बुरा न मानो होली है' असे म्हणत विरोधक किंवा शत्रूच्याही चेहऱ्याला रंग लावून, त्याची गळाभेट घेऊन, जुने हेवेदावे विसरण्याची ही परंपरा लोकशाही रचनेला बळकटी देते. या सणाला खाद्यसंस्कृतीचीही जोड आहे. पुरणपोळी हा महाराष्ट्रातील खास बेत असतो, तर उत्तर भारतात गुजिया, मठरी आणि दही वडा यांसारखे पदार्थ मोठ्या आवडीने बनवले जातात. ढोल-ताशांच्या गजरात आणि लोकगीतांच्या सुरात नाचणे, हे या सणाचे अविभाज्य अंग आहे.

## निसर्गातील नवचैतन्याचा काळ

हा काळ निसर्गासाठी नवचैतन्याचा असतो. वृक्षवेलींनी आपली जुनी पाने त्यागून नवी पालवी धारण केलेली असते. निसर्गातील हा बदल मानवी जीवनातही प्रतिबिंबित व्हावा, हा होळीमागचा मूळ हेतू आहे. या दिवशी संध्याकाळी मिठाईची देवाणघेवाण, गोडधोडाचा स्वयंपाक, सर्वांनी एकत्रितपणाने या मेजवानीचा आस्वाद घेण्याची परंपरा आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद घेण्याची प्रथा नात्यांमधील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करते. वसंत ऋतूच्या आगमनासोबतच निसर्ग जसा कात टाकतो, तशीच माणसानेही आपल्या मनातील द्वेष, अहंकार आणि कटुता सोडून देऊन क्षमाशील व्हावे, अशी यामागची धारणा आहे. आज होळी न्यूयॉर्क, लंडन, सिडनी आणि दुबई यांसारख्या शहरांमध्येही होळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. परदेशात राहणारे भारतीय समुदाय आपल्या संस्कृतीचे जतन करत असतानाच तिथल्या स्थानिक नागरिकांनाही या रंगात सामावून घेतात. अनेक ठिकाणी 'कलर रन्स' सारखे उपक्रम राबवून या सणाचा आनंद द्विगुणित केला जातो.

होळी हा सण आपल्याला जगण्याचे रंग शिकवतो. हा सण एक नवी आशा आणि एकोप्याचा संदेश आहे. हा उत्सव साजरा करताना त्यातील मूळ तत्त्वज्ञान जपले पाहिजे. पाणी वाचवणे आणि नैसर्गिक रंगांचा वापर करणे, हे निसर्गाप्रती आपले कर्तव्य आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्यातील द्वेष, मत्सर आणि अहंकार तसेच नकारात्मकता, कटूता यांची आहुती दिली, तरच खऱ्या अर्थाने हा उत्सव सार्थ ठरेल. ●●●

# अन्वयार्थ देवजीच्या शरणागतीचा



**देवेंद्र व्यास,** इंदोर

काही वर्षांपूर्वी नक्षलवाद्यांच्या रक्तरंजित हिंसाचाराने देशाच्या अंतर्गत सुरक्षेपुढे बिकट आव्हान निर्माण केले होते. दर काही महिन्यांनी नक्षलवाद्यांनी छुप्या मार्गाने हल्ला केल्याच्या आणि त्यामध्ये आपले पोलीस, जवान ठार झाल्याच्या बातम्या ऐकायला मिळत असत. परंतु केंद्र सरकारने माओवादाचा बिमोड करण्यासाठी आर या पार'चे मिशन हाती घेतले आणि गेल्या वर्ष-दोन वर्षांमध्ये देशाच्या मध्य आणि पूर्व भागातील घनदाट जंगलांमधून शरणागतीचे सूर सातत्याने कानी पडत आहेत. हा बदल क्रांतिकारी आहे. एकेकाळी ज्या लाल कॉरिडॉरचा दबदबा जवळपास ४० टक्क्यांहून अधिक भारतात होता, तो आता केवळ काही मोजक्या जिल्ह्यांपर्यंत मर्यादित राहिला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशाला पूर्णपणे 'नक्षलमुक्त' करण्याचा संकल्प सोडला आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी अतिशय नियोजनबद्धरित्या पावले टाकली जात आहेत.

## पटकथेसारखा नाट्यमय प्रवास

देवजी हा नक्षलवादी चळवळीतल्या अन्य नक्षलींसारखा असला तरी त्याचा प्रवास एखाद्या चित्रपटाच्या पटकथेसारखा नाट्यमय आहे. ६५ वर्षांचा देवजी तेलंगणा पोलिसांसमोर हजर झाला, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर थकवा होता, पण त्याच्या नावावर असलेला इतिहास रक्ताने माखलेला होता. देवजीचा जन्म जगतिआल जिल्ह्यात झाला. १९८० च्या दशकात तो कोरुतला येथे शिक्षण घेत असताना जहाल विचारांकडे आकर्षित झाला. रॅडिकल स्टुडंट्स युनियनच्या माध्यमातून सुरू झालेला हा प्रवास १९८३ मध्ये 'पीपल्स वॉर ग्रुप' मध्ये अधिकृत प्रवेशापर्यंत पोहोचला. सुरुवातीला एक संघटक म्हणून काम करणाऱ्या देवजीने अल्पावधीतच दंडकारण्याच्या जंगलात आपली पकड मजबूत केली.

पक्षाने त्याला गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात पाठवले, जिथे त्याने सुमारे १५ वर्षे संघटनेचे जाळे विणण्याचे काम केले. १९९० च्या दशकात त्याची ओळख केवळ एका विचारवंतापुरती मर्यादित न राहता तो एक कुशल लष्करी रणनीतीकार म्हणून उदयास आला. २००४ मध्ये नक्षलवाद्यांच्या विविध गटांचे विलीनीकरण होऊन 'सीपीआय माओवादी' या संघटनेची स्थापना झाली, तेव्हापासून देवजी या संघटनेच्या सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या पोलिट ब्युरो आणि सेंट्रल मिलिटरी कमिशनचा अविभाज्य भाग बनला होता.

## प्रमुख हल्ल्यांची ब्ल्यूप्रिंट

मागील काळात भारतीय सुरक्षा दलांवर झालेल्या काही भीषण हल्ल्यांचे नियोजन त्याच्याच मेंदूतून झाले होते. १५ मार्च २००७ ची काळरात्र आजही सुरक्षा दलांच्या आणि सबंध देशाच्या स्मरणात असावी. या दिवशी विजापूर जिल्ह्यातील राणीबोदली येथे ५५ सीआरपीएफ जवानांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या हल्ल्याचे प्रत्यक्ष नेतृत्व एका महिला कमांडरने केले असले, तरी त्याची रणनीती आणि 'ब्लूप्रिंट' देवजीनेच तयार केली होती, असे गुप्तचर यंत्रणांचे मत आहे.

६ एप्रिल २०१० रोजी दंतेवाडा येथील ताडमेटला जंगलात झालेला हल्ला हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या इतिहासातील सर्वात मोठा ठपका ठरला. ७६ जवानांना हौतात्म्य पत्करावे लागलेल्या या ॲम्बुशचे नियोजन करताना देवजीने गनिमी काव्याचा असा वापर केला होता की, सुरक्षा दलांना सावरण्याची संधीच मिळाली नाही. या हल्ल्यांनंतर तो सुरक्षा यंत्रणांच्या 'मोस्ट वाँटेड' यादीत अग्रस्थानी आला. त्याच्यावर छत्तीसगड आणि तेलंगणा अशा विविध राज्यांनी मिळून कोट्यवधी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

मे २०२५ मध्ये नक्षलवाद्यांचा सरचिटणीस बासवराजू याचा सुरक्षा दलांसोबतच्या चकमकीत मृत्यू झाला आणि देवजीकडे संघटनेची धुरा सोपवण्यात आली. मात्र, बासवराजूच्या मृत्यूनंतर संघटनेत पडलेली फूट आणि वाढता दबाव देवजीला पेलता आला नाही. मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये मल्लोजुला वेणुगोपाळ ऊर्फ 'सोनू' याने शरणागती पत्करली, तेव्हापासूनच नक्षलवाद्यांच्या सर्वोच्च नेतृत्वामध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती.

एकेकाळी एके-४७ हातात घेऊन जंगलात वावरणारा हा कमांडर वाढते वय आणि ढासळणाऱ्या आरोग्यामुळे जेरीस आला होता. तेलंगणा पोलिसांनी राबवलेल्या 'ऑपरेशन कगार-२' आणि केंद्राच्या वाढत्या दबावामुळे देवजीकडे दोनच पर्याय उरले होते - एक तर चकमकीत मृत्युमुखी पडणे किंवा शरणागती. अखेर त्याने आपल्या काही निकटवर्तीय साथीदारांसह मुलुगु जिल्ह्यात शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला.

बासवराजूच्या मृत्यूनंतर देवजीने सूत्रे हाती घेतली होती, मात्र आता त्याच्या शरणागतीमुळे संघटनेत नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. नक्षलवादी चळवळीत सध्या 'तेलगू लॉबी' विरुद्ध 'स्थानिक आदिवासी नेतृत्व' असा सुप्त संघर्ष सुरू असल्याचे बोलले जाते. देवजीच्या जाण्याने हा संघर्ष अधिक तीव्र होऊ शकतो. संघटनेच्या 'सेंट्रल कमिटी'मध्ये आता मोजकेच जुने नेते उरले आहेत, जे बहुतांश वृद्ध आणि आजारी आहेत. नवीन फळीतील नेतृत्वाकडे देवजीसारखा अनुभव किंवा लष्करी कौशल्य नसल्यामुळे संघटनेची निर्णयक्षमता मंदावेल, ज्याचा थेट फायदा सुरक्षा दलांना मिळेल.

## परिणाम काय होणार ?

**देवजीसारख्या उच्चपदस्थ माओवादी नेत्याची शरणागती हा या प्रतिबंधित संघटनेच्या संपूर्ण संरचनेला बसलेला एक मोठा धक्का आहे. संघटनेच्या ४० वर्षांच्या इतिहासात सरचिटणीस पदावरील व्यक्तीने अशा प्रकारे शरणागती पत्करण्याची ही पहिलीच वेळ असावी. या घटनेचे दूरगामी परिणाम केवळ सुरक्षा दलांच्या मनोबलावरच नव्हे, तर नक्षलवाद्यांच्या अंतर्गत गोटात आणि बस्तरच्या भूगोलावरही होणार आहेत.**

नक्षलवादी चळवळीचा कणा हा त्यांच्या 'केडर'च्या निष्ठेवर अवलंबून असतो. जेव्हा संघटनेचा सर्वोच्च मार्गदर्शक, ज्याने हजारो तरुणांना 'क्रांती'च्या नावाखाली बंदुका हातात घ्यायला लावले, तोच स्वतः शस्त्रे टाकून पोलिसांसमोर उभा राहतो, तेव्हा तळागाळातील कार्यकर्त्यांचा वैचारिक पाया डळमळीत होतो. जंगलात लढणाऱ्या उर्वरित जहाल नक्षलवाद्यांमध्ये अविश्वास आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण होईल. आमचा सर्वोच्च नेताच सुरक्षित नाही किंवा त्यालाच या लढाईवर विश्वास उरला नाही, तर आम्ही कोणासाठी लढतोय? असा प्रश्न आता जहाल नक्षलवाद्यांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे.

देवजी हा संघटनेचा 'थिंक टँक' किंवा 'ब्रेन' होता. ४० वर्षे जंगलात राहिल्यामुळे त्याला दंडकारण्याचा कानाकोपरा माहीत आहे. त्याच्याकडे संघटनेच्या गुप्त आर्थिक स्रोतांची, शहरी जाळ्याची आणि शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्याची अत्यंत गोपनीय माहिती असण्याची शक्यता आहे. पोलीस चौकशीत या माहितीचा उलगडा झाला, तर सुरक्षा यंत्रणांना नक्षलवाद्यांच्या उरल्यासुरल्या तळांवर अचूक सर्जिकल स्ट्राईक करणे सोपे जाईल. छत्तीसगड, महाराष्ट्र आणि तेलंगणा सीमाभागातील नक्षलवाद्यांची रसद पूर्णपणे तुटू शकते. ●●●

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# निसर्गापेक्षा मानवी आपत्तीचाच जास्त धोका

**दरवर्षी** जगात १ मार्च हा दिवस जागतिक नागरीक संरक्षण दिन म्हणून पाळला जातो. १९७२ पासून त्याची सुरुवात झाली. म्हणजे जवळपास गेली पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ हा नागरी संरक्षण दिन पाळला जातो. तो साजरा करण्यामागचा उद्देश हाच होता की नैसर्गिक आपत्ती आणि मनुष्यनिर्मित संकटांपासून समाजाचे संरक्षण व्हावे म्हणजेच येणाऱ्या कोणत्याही आपत्तीच्यावेळी सजग आणि सतर्क राहणे हे जितके गरजेचे आहे, तितकेच आपत्ती येणार नाही किंवा आलेल्या आपत्तींपासून तातडीने सर्वांचे संरक्षण करता यावे याकरीता जागृती निर्माण करण्याचे निमित्त म्हणून या दिवसाचे महत्त्व सांगितले जाते. आत्तापर्यंत नैसर्गिक आपत्तीमध्ये भूकंप, वादळ, अतिवृष्टी, यासारख्या संकटांचा समावेश होत होता. परंतु गेल्या वीस-पंचवीस वर्षांत हवामानामध्ये प्रचंड बदल होत गेला. विज्ञान तंत्रज्ञानाने इतकी प्रचंड झेप घेतली की, पर्यावरणात सतत होणारे बदल हे नव्या नैसर्गिक आपत्तीला जन्म देणारे ठरले तर विज्ञान तंत्रज्ञानाच्या वेगवेगळ्या शोधांनी सुखसोयींबरोबर मानवनिर्मित आपत्तीही निर्माण केली आहे. किंबहुना गेल्या वीस-पंचवीस वर्षांत जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी निर्माण झालेल्या आपत्ती किंवा संकटांचा विचार केला तर नैसर्गिक आपत्तीपेक्षाही मानवनिर्मित आपत्तीपासूनच माणसाला सर्वाधिक धोका असल्याचे म्हणण्याची वेळ येते. नैसर्गिक कारणांमुळे अनेक ठिकाणी भूकंप होतात. अगदी तुफान बर्फवृष्टी किंवा अतिवृष्टी, चक्रीवादळ किंवा मोठमोठे वणवे पसरण्याच्या धोक्यापासून ज्वालामुखीसारखे प्रकारही घडत असतात. जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे हवामान किंवा ऋतूमान असते. तिथल्या भौगोलिक परिस्थितीनुसार नैसर्गिक आपत्तींचे प्रकारही वेगवेगळे असतात. परंतु भारतासारख्या एकाअर्थी संतुलित हवामान असलेल्या देशातसुद्धा पर्यावरणातून काही नवी संकटं निर्माण झालेली दिसून येतात. ज्यामध्ये तापमानाचे वाढलेले प्रमाण आणि अवकाळी पावसाचा गेल्या काही वर्षातला भडीमार बरेच मोठे नुकसान करणाराही ठरला आहे. भारतात भूकंपाचे प्रमाण जरी कमी असले तरी वर्षाकाठी होणारी दोन-तीन चक्रीवादळं सोडली तर पावसाळ्यात मात्र अतिवृष्टी आणि महापुरातून बऱ्यापैकी तडाखा बसत असतो.

### आपत्ती व्यवस्थापनाची गरज

या सगळ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याकरीता सरकारतर्फे आपत्ती व्यवस्थापन विभाग सुरू झाला. साधारणपणे तीस वर्षांपूर्वी गुजरातच्या भूज भागात झालेला सर्वात मोठा भूकंप आपत्ती व्यवस्थापनाची आवश्यकता सिद्ध करणारा ठरला. त्यापूर्वी महाराष्ट्रात मराठवाड्यात झालेला भूकंप अनेकांचे बळी घेणारा ठरला होता. परंतु या दोन्ही आपत्तींच्यावेळी स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन हा प्रकारच अस्तित्वात नसल्याने त्याची मोठी किंमत मोजावी लागली होती. अर्थात भूकंपासारखी आपत्ती ही खूप अचानकपणे येते. हवामानाच्या अंदाजाप्रमाणे अतिवृष्टी किंवा चक्रीवादळाची पूर्वसूचना काही प्रमाणात मिळते आणि सावधगिरीची उपाययोजना करताही येते. तसे भूकंपाच्याबाबतीत अजून होऊ शकलेले नाही. परंतु जर आपत्ती व्यवस्थापन असेल तर पुरेशा प्रमाणात सावधगिरीचे उपाय करता येतात आणि विशेषतः लोकांचे जीव वाचवता येतात. अलिकडच्या काळात हवामानातला बदल आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचे उभे राहिलेले संकट तितकेच गंभीर स्वरूपाचे ठरले आहे. यातली वस्तुस्थिती अशी आहे की, वाढते तापमान हा पूर्णपणे नैसर्गिक आपत्तीचा भाग म्हणता येत नाही. ज्याला जगभरातले औद्योगिकरण वेगवेगळ्या विकासाच्या योजना, बेसुमार जंगलतोड, भयानक स्वरूपाची वाहनसंख्येतली वाढ, प्रदूषण निर्माण करणारी कारखानदारी अशा एक ना अनेक कारणांमुळे पर्यावरणाचे संकट अधिक गंभीर झालेले आहे. म्हणजेच ते जितके निसर्गनिर्मित आहे, तितकेच मानवनिर्मितही ठरते. आजच्या या नागरी संरक्षण दिनाच्यानिमित्ताने लोकांच्या संरक्षणाचा विचार करायचा असेल तर नैसर्गिक आपत्तीपेक्षाही मानवनिर्मित आपत्तींचा सामना हा अधिक महत्त्वाचा ठरतो. विशेषतः विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून मानवाच्या अस्तित्वापुढे केव्हा कसे गंभीर संकट निर्माण होईल हे सांगता येत नाही. अगदी जगभर थैमान घालणारी कोरोनाची महामारी ही अशीच मानवनिर्मित व्हायरसची महामारी असल्याचे सांगितले गेले होते. एवढेच नव्हे तर जगात कुठे ना कुठे सुरू असलेली छोटीमोठी युद्ध त्यासाठी वापरले जाणारे रासायनिक पदार्थ किंवा सामुग्री यातून प्रदूषित होणारे पर्यावरण आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा वेगवेगळ्या रोग आणि आजारांचा प्रभाव दुर्लक्षित करता येत नाही.

### आगामी कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग

पुढच्या वीस-पंचवीस वर्षांत आणखी एका मानवनिर्मित सुख आणि संकटाचीदेखील चाहूल लागलेली आहे. सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली मोबाईल किंवा डिजिटल युगाचा अनुभव सगळे जग घेते आहे. त्यातले लाभ किंवा फायदे उपभोगत असताना त्याच्या दुष्परिणामांचाही सामना करावा लागतो आहे. मग मोबाईलच्या अतिवापराने मेंदू निकामी होण्यापासून ते त्यापासून उद्‌भवणाऱ्या वेगवेगळ्या रोगांचाही प्रादुर्भाव होतो आहे. शिवाय आजच्या या इंटरनेटच्या युगात अनावश्यक माहितीचा भडीमार होत असल्याने मनुष्याच्या मनावर होत असलेले दुष्परिणाम मानवनिर्मित आपत्तीचेच निदर्शक ठरतात. येऊ घातलेली कृत्रिम बुद्धिमत्तेची लाट कसा परिणाम दाखवते, हे येणाऱ्या काळात कळेलच. परंतु सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाचे ज्या पद्धतीने काही दुष्परिणाम समोर आले आहेत ते पाहता कृत्रिम बुद्धिमत्ता हा प्रकारही मनुष्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणारा ठरू शकतो. अनेक गोष्टी तयारी स्वरूपात आणि त्याही काही क्षणात उपलब्ध होतील अशा हुबेहुब मनुष्याच्याच प्रतिकृती हे तंत्रज्ञान साकार करेल ज्यातून खरे काय आणि खोटे काय हे ओळखणेसुद्धा कठीण होणार आहे. जगाची गतिमानता वाढेल, पण मनुष्याच्या कार्यक्षमतेला तितकाच मोठा धक्का बसेल हे वास्तव नाकारता येणार नाही. विशेषतः भारतासारखी मोठी लोकसंख्या असलेल्या देशाने कृत्रिम बुद्धिमत्तेचे आगामी युग खूप सावधपणे लक्षात घेतले पाहिजे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

प्रत्येक दिवस चांगला असेलच असे नाही, पण प्रत्येक दिवसात काही तरी चांगले असतेच.

## पंचांग

**रविवार, ०१ मार्च २०२६**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

*** फाल्गुन शुक्ल त्रयोदशी**
**नक्षत्र - पुष्य**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**रवी उदय- ०६-५९**
**रवी अस्त- १८-४३**

**प्रदोष; रेणुकाचार्य जयंती; रेवणाराध्य जयंती;**
**सायं. पश्चिमेस बुध लोप**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### चिकन बिर्याणी



**साहित्यः-**
१/२ किलो लोकल बासमती तांदूळ, १/२ किलो चिकन
खडा मसाला (१ ते २ तमालपत्र,१ मोठी वेलची,२ लहान वेलची,१ चक्री फुलं,३ ते ४ लवंग आणि काळी मिरी,१ ते २ दालचिनी)
२०० ग्रॅम दही, १-१/२ टेबलस्पून आलं लसूण पेस्ट, टेबलस्पून बिर्याणी मसाला, १-१/२ टेबलस्पून लाल तिखट, १/२ टेबलस्पून गरम मसाला, १/२ टेबलस्पून हळद, १/२ टेबलस्पून धने पूड, १/२ टेबलस्पून जीरे पूड, २ टेबलस्पून लिंबाचा रस, ६ कांदे, २ टोमॅटो, ७ ते ८ टेबलस्पून तेल,
१/२ टेबलस्पून जिरं, १ वाटी चिरलेली कोथिंबीर, वाटी मोठी वाटी पुदिन्याची पानं, २ टेबल स्पून खाण्याचा कलर, ४-५ टेबलस्पून साजूक तूप
मीठ चवीनुसार, १/४ टीस्पून साखर, पाणी

**कृती :-**
बासमती तांदूळ ३ ते ४ वेळा पाण्यात धुवून १ तास पाण्यात भिजत ठेवणे. चिकन स्वच्छ धुवून त्यात २०० ग्रॅम दही १ आणि १/२ टेबलस्पून आलं लसूण पेस्ट, १ टेबलस्पून बिर्याणी मसाला, १ आणि १/२ टेबलस्पून लाल तिखट, १/२ टेबलस्पून हळद, १/२ टेबलस्पून गरम मसाला, १ टेबलस्पून लिंबाचा रस घालून चिकनला सर्व साहित्य नीट लावून दीड तासासाठी मरिनेट करणे. १ तासाने बिर्याणीसाठी लागणारा तांदूळ शिजवणे. त्यासाठी गॅसवर एका पातेल्यात ४ ते ५ ग्लास पाणी गरम करून त्यात खडा मसाला घालणे.(१ तमालपत्र,१ मोठी वेलची,२ छोटी वेलची, १ चक्री फुलं,३ ते ४ काळी मिरी आणि लवंग, १ ते २ दालचिनी) नंतर त्यात तांदळापुरते मीठ घालणे. पाण्याला उकळी आली की, त्यात भिजवलेला तांदूळ घालणे. तांदूळ ८० ते ९० टक्के शिजवून घेणे. तांदूळ शिजला की, त्यातील एक्स्ट्रा पाणी काढून भात थंड करायला ठेवणे.

# सामना जिंकूनही पाकिस्तान विश्वचषकातून बाहेर

## साहिबजादा फरहानची शतकी खेळी वाया

**पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८च्या सामन्यात पाकिस्तानने श्रीलंकेला ५ धावांनी पराभूत केले. साहिबजादा फरहानच्या शतकाच्या बळावर पाकिस्तानने २१३ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात कर्णधार दासुन शनाकाच्या जोरदार फटकेबाजीमुळे श्रीलंकन संघाने ६ बाद २०७ धावा केल्या. या सामन्यात पाकिस्तानला उपांत्य सामन्यात जाण्यासाठी श्रीलंकेला १५१ धावांपर्यंत रोखणे गरजेचे होते. मात्र असे करण्यास पाकिस्तान संघाला अपयश आल्याने उपांत्य सामन्यात जाता आले नाही.**



■ पल्लेकेले

प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानने आपल्या डावाची जोरदार सुरुवात केली. सलामीवीर साहिबजादा फरहान आणि फखर झमान यांनी श्रीलंकेच्या गोलंदाजांची धुलाई करून षटकार आणि चौकारांचा पाऊस पाडला आणि १० षटकांमध्ये १०० धावा पूर्ण केल्या. त्यानंतर त्यांनी आपल्या फलंदाजीची चमक सुरू केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी १५.५ षटकांत १७६ धावांची भागिदारी केली. फखर जमान ४२ चेंडूंत ८४ धावा बाद झाल्यानंतर फरहानने ६० चेंडूत शतक ठोकले. तो मोठ्या फटका मारण्याच्या नादात बाद झाला. मग शेवटच्या षटकांत पाकिस्तानची फलंदाजी गडबडली आणि ३४ धावांमध्ये ७ विकेट गमावल्या. त्यामुळे पाकिस्तानने श्रीलंकेला विजयासाठी निर्धारित षटकांत ८ बाद २१२ धावांचे आव्हान दिले. मात्र पाकिस्तानला विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत जाण्यासाठी श्रीलंकेला १५१ धावांपर्यंत रोखणे महत्त्वाचे होते. पण पाकिस्तानला असे करण्यात अपयश आले. श्रीलंकेच्या फलंदाजांनी निर्धारित षटकांत ६ बाद २०७ धावा केल्या. श्रीलंकेकडून पवन रथनायकेने ५८, चरिथ असलंकाने २५, कामिल मिशाराने २६, दासुन शनाकाने नाबाद ७६ धावा केल्या. श्रीलंकेला शेवटच्या षटकांत २८ धावांची गरज होती. दासुन शनाकाने या षटकांच्या पहिल्या चार चेंडूंवर ६ षटकार आणि १ चौकार ठोकला. त्यामुळे शेवटच्या दोन चेंडूंवर विजयासाठी ६ धावांची आवश्यकता होती. मात्र दोन चेंडूंवर त्याला एकही धाव काढता आली नाही आणि श्रीलंकन संघ विजयापासून ५ धावांनी दूर राहिला.

## मॉलिन्युक्स भारताविरुद्ध उर्वरित सामन्यातून बाहेर

■ होबार्ट

ऑस्ट्रेलियन महिला संघातील सोफी मॉलिन्युक्स दुखापतीमुळे भारताविरुद्ध एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात आणि एकमेव कसोटीत खेळू शकणार नसल्याचे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सांगितले. सोफीला पाठदुखापतीची समस्या जाणवत आहे. आता ऑस्ट्रेलियन संघात मॉलिन्युक्सच्या जागी अष्टपैलू निकोला कॅरेला बदली खेळाडू म्हणून संधी देण्यात आली. इलेसी पेरी आणि किम गॅरैथ या दोन ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटू दुखापतीमुळे उर्वरित एकमेव एकदिवसीय आणि एकमेव कसोटी सामन्यासाठी उपलब्ध होऊ शकणार नाहीत.

## जम्मू-काश्मीरने प्रथमच रणजी ट्रॉफी जिंकली

### औकिब नबी ६० विकेटसह मालिकावीर ठरला

■ हुबली

कर्नाटकविरुद्धचा रणजी ट्रॉफीचा अंतिम सामना अनिर्णित राहिल्यानंतर पहिल्या डावातील आघाडीच्या आधारे जम्मू-काश्मीरने पहिले रणजी ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले. या अंतिम सामन्यात जम्मू-काश्मीर संघाने फलंदाजीसह गोलंदाजीतही कमाल केली. संघाने पहिल्या डावात ५०० पेक्षा अधिक धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात कर्नाटकचा पहिला डाव २९३ धावसंख्येवर संपुष्टात आला होता. यामुळे जम्मू-काश्मीरने पहिल्याच डावात मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या डावातही जम्मू-काश्मीरने ४ विकेट गमावत ३४२ धावा केल्या. जम्मू- काश्मीरच्या शुभम पुंडीरने या सामन्यात १२१ धावा केल्या होत्या. त्यामुळे त्याला सामनावीर म्हणून घोषित केले. स्पर्धेत जम्मू-काश्मीरच्या औकिब नबीने ६० विकेट आणि २४५ धावा केल्यामुळे त्याला मालिकावीर म्हणून जाहीर केले. या सामन्याच्या शेवटच्या दिवशी आज कर्नाटकच्या गोलंदाजांना जम्मू-काश्मीरच्या फलंदाजांची भागीदारी तोडण्यात अपयश आले. शेवटी जम्मू-काश्मीरचा कर्णधार पारस डोग्रा आणि कर्नाटकचा कर्णधार देवदत्त पड्डीकल यांनी सामना ड्रॉ करण्याचा निर्णय एकमताने घेतला. जम्मू-काश्मीरने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी केली होती. त्यामुळे पहिल्या डावात जम्मू-काश्मीरने सर्व विकेट गमावत ५८४ धावा केल्या.

## उपांत्य सामन्यात जाण्यासाठी आज भारत आणि वेस्ट इंडिज भिडणार

■ कोलकाता



कोलकात्याच्या ईडन गार्डन्स क्रिकेट स्टेडियमवर उद्या होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर ९ च्या शेवटच्या सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिजच्या संघात लढत होणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी 'करो या मरो' सारखा आहे. या सामन्यात जो संघ जिंकेल, तोच संघ टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य सामन्यात प्रवेश मिळवेल. त्यामुळे सामन्यात दोन्ही संघांत जोरदार रस्सीखेच पाहायला मिळणार आहे. इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांनी याआधीच उपांत्य सामन्यात धडक मारली आहे. लॉडर हिल येथे भारत आणि वेस्ट इंडिज संघांत १३ ऑगस्ट २०२३ रोजी शेवटचा टी-२० सामना झाला होता. हा सामना वेस्ट इंडिज ८ विकेटने १२ चेंडू शिल्लक राखून जिंकला होता. शेवटच्या ५ सामन्यांत भारताने ३ सामने जिंकले, तर दोन सामन्यांत वेस्ट इंडिजने विजय मिळवला. अहमदनगरच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शेवटच्या सामन्यात वेस्ट इंडिजला ९ विकेटने पराभव पत्करावा लागला असला तरी भारतीय संघ वेस्ट इंडिज संघाला हलक्यात घेण्याची चूक करणार नाही. १० वर्षांपूर्वी वेस्ट इंडिजने भारतावर एक जखम केली होती, ज्याची वेदना अजूनही ताजी आहे. २०१६ च्या टी-२० विश्वचषक उपांत्य सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा ७ विकेटने पराभव करून भारताचे घरच्या मैदानावर चॅम्पियन होण्याचे स्वप्न भंग केले.

## पी.एम.बाथ कॅरम स्पर्धा! निशार शेख दुसऱ्या फेरीत

■ मुंबई

**जिल्हा** कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने पी. एम. हिंदू स्विमिंग बाथ अँड बोट क्लब, चर्नीरोड येथे सुरू असलेल्या मुंबई जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या पहिल्या फेरीत ए. के. फाऊंडेशनच्या निशार शेखने वरळी स्पोर्ट्स क्लबच्या रवींद्र पेडणेकरचा २५-१, १७-२५ व २५-४ असा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तर विजय कॅरम क्लबच्या लियाकत नागरजीने ए. के. फाऊंडेशनच्या पौरस करगुटकरवर २१-१४, २३-१६ अशी मात करून आगेकूच केली. तत्पूर्वी पी. एम. हिंदू स्विमिंग बाथ अँड बोट क्लबचे सेक्रेटरी हितेशभाई शहा यांनी स्पर्धेचे उद्‌घाटन केले.

मुंबई पालिकेच्या जितेंद्र राठोडने कमलेश राठोडवर १०-१९, २२-१०, २५-१३, विलास झिटेने अशोक गायकवाडवर १५-२५, २५-७, २५-१०, राहुल सोळंकीने तुषार जॅकवर २५-०, २५-०, सोहम बोडसने संतोष सावंतवर २५-५, २५-१२, हरीश सोनीने राजेंद्र अहिरेवर २१-०, २५-०, विनोद बारियाने नंदन मुळेवर २५-१६, २५-७, मंगेश जागष्ठेने चंद्रकांत पेडामकरवर ५-२३, १५-१२, २३-१७, निलेश परबने सोहम जाधववर २५-३, २५-५, प्रवीण सावंतने हेमंत कुडाळकरवर १९-१२, १९-५, निमेश उबाळेने अमित देसाईवर २५-०, २५-८ वर विजय मिळवला.

## मुंबई जिमनॅस्टिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी संजय शेटे यांची निवड

**मुंबई**-वडाळा येथील मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयात झालेली मुंबई मुंबई शहर जिमनॅस्टिक असोसिएशनची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. असोसिएशनच्या अध्यक्षपदी संजय शेटे, उपाध्यक्षपदी अजय मापुस्कर, तन्वी जिंदाल शेटे, वर्षा उपाध्ये यांची निवड झाली. सचिवपदी डॉ. राजेंद्र नाना शेळके, उपसचिवपदी देवेंद्र पाटील, सोनाली सावंत, प्रकाश जावळे, खजिनदारपदी डॉ. दादासाहेब शिंदे, सभासदपदी राजेंद्र ढाकणे, अक्षता शेटे जाधव, फिरोज बेळगावकर, गणेश चाळके, सिद्धेश मांजरेकर, प्रेमानंद नाईक, रविंद्र विसपुते, आकाश डोंगरे, प्रशांत गायकवाड, संदीप चव्हाण यांची निवड करण्यात आली.

## राष्ट्रीय कबड्डी पुरुष स्पर्धा! महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद

■ वडोदा



**७२व्या** वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राने अंतिम फेरीपर्यंत धडक दिली. त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. वडोदा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र रेल्वेकडून ३१-४९ असा पराभूत झाला. हरियाणा येथे २०२२ साली झालेल्या ६८ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत देखील महाराष्ट्र सेनादलाकडून पराभूत झाला होता. हैदराबाद येथे २०१७ साली झालेल्या विजयाची पुनरावृत्ती करण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला.

भारतीय रेल्वेचे स्पर्धेत सहभाग (१९५९) घेतल्यापासूनचे हे २५ वे जेतेपद. १९६१ सालापासून महाराष्ट्राची अंतिम फेरी गाठण्याची ही २१ वी वेळ. फक्त ८ वेळा जेतेपद मिळविले. महाराष्ट्राने झोकात सुरुवात करीत रेल्वेवर पहिला लोण देत १८-१३ अशी आघाडी घेतली. लोणची परतफेड करीत रेल्वेने २२-१८ अशी आघाडी घेत आपला इरादा स्पष्ट केला. याच गुणावर सामन्याचा मध्यंतर झाला. दुसऱ्या डावात मात्र रेल्वेने आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी चढाईत २१ गुण, यशस्वी पकडी करत १४ गुण, ५ बोनस गुण मिळवित महाराष्ट्रावर बाजी पलटविली. महाराष्ट्राला चढाईत १२ गुण, पकडीत १३ व ३ बोनस गुण घेता आले. तसे पाहिले असता महाराष्ट्र विरुद्ध महाराष्ट्र असाच हा सामना झाला. पंकज मोहिते, शुभम शिंदे, अजिंक्य पवार यांच्या खेळण्याने रेल्वेचा संघ वरचढ ठरला.

देश विदेश

# नितीश कटारा हत्येचा आरोपी यादवला ८ दिवसांची फर्लो रजा

■ नवी दिल्ली



**नितीश** कटारा हत्याकांडातील मुख्य आरोपी विकास यादव याला सर्वोच्च न्यायालयाने कुटुंबियांसोबत होळीचा सण साजरा करण्यासाठी २८ मार्च ते ७ मार्च अशी आठ दिवसांची फर्लो रजा मंजूर केली आहे. यादव या प्रकरणात २५ वर्षांची कारावासाची शिक्षा भोगत आहे. याआधी ११ फेब्रुवारी रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने विकास यादव याची २१ दिवसांच्या फर्लो रजेची मागणी फेटाळली होती.

त्यानंतर विकास यादव याने फर्लोसाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. न्या. एम. एम. सुंद्रेश आणि न्या. विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठासमोर त्याच्या अर्जावर नुकतीच सुनावणी झाली. त्याप्रसंगी आम्ही अर्जदाराच्या मागणीच्या गुण-दोषाची चर्चा न करता त्याला आठ दिवसांची फर्लो रजा मंजूर करत आहोत, असे न्यायालयाने सांगितले. विकास यादव हा उत्तर प्रदेशमधील वजनदार राजकीय नेते डी. पी. यादव यांचा मुलगा आहे. त्याची बहीण भारती यादव हिचे नितीश कटाराशी प्रेमसंबंध होते. मात्र यादव कुटुंबियांचा या प्रेमसंबंधांना विरोध होता. त्यामुळे विकास यादव आणि त्याचा चुलत भाऊ विशाल यादव यांनी अन्य एका मित्राच्या मदतीने १६ फेब्रुवारी २००२ रोजी मध्यरात्री एका विवाह मंडपातून नितीश कटारा याचे अपहरण केले आणि त्याची निर्घृण हत्या केली. या प्रकरणी विकास आणि विशाल यादव यांना प्रत्येकी २५ वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. तर सहआरोपी सुखदेव यादव याला २० वर्षांच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली.

# नोटांनी भरलेले विमान कोसळले नोटांसाठी झुंबड! १५ जणांचा मृत्यू

■ सूक्रे



**दक्षिण** अमेरिकेतील बोलिव्हिया देशात हवाई दलाचे हरक्युलस मालवाहू विमान कोसळले. हे विमान देशाच्या विविध भागांत नवीन चलनी नोटा पोहोचवण्यासाठी जात होते. या दुर्घटनेत १५ जणांचा मृत्यू तर सुमारे ३० जण जखमी झाले आहेत. अपघातानंतर विमानातील चलनी नोटा रस्त्यावर विखुरल्याने त्या उचलण्यासाठी स्थानिकांमध्ये मोठी झुंबड उडाली. या घटनेचे काही व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहेत.

अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाच्या माहितीनुसार, एल अल्टो विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न करत असताना विमानाचा ताबा सुटला आणि ते धावपट्टीवरून घसरले. धावपट्टीची सीमा ओलांडून विमान जवळील भागात घुसले आणि कोसळताच त्याला भीषण आग लागली. अपघातावेळी विमानाने रस्त्यावरील काही वाहनांनाही जोरदार धडक दिल्याने दुर्घटनेची तीव्रता वाढली.

# नेपाळमध्ये उठावानंतरची पहिली सार्वत्रिक निवडणूक ५ मार्चला

■ काठमांडू

**गेल्या** वर्षी सप्टेंबर महिन्यात तरुणाईने केलेल्या उठावामध्ये के पी शर्मा ओली यांचे सरकार कोसळल्यानंतर नेपाळ पहिली सार्वत्रिक निवडणूक ५ मार्च रोजी होत आहे. भारत आणि चीनचे या निवडणुकीकडे विशेष लक्ष लागले आहे.नेपाळची लोकसंख्या ३ कोटींच्या आसपास आहे.त्यापैकी १ कोटी ९० लाख पात्र मतदार आहेत.तरुणाईच्या उठावानंतर आतापर्यंत दहा लाख नव्या मतदारांची नोंद झाली आहे.हे सर्व दहा लाख मतदार पहिल्या वेळी आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

नेपाळच्या संसदेत २७५ सदस्य आहेत.त्यापैकी १६५ सदस्य थेट मतदानाच्या माध्यमातून निवडले जाणार आहेत. उर्वरित सदस्य राजकीय पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीच्या आधारे निवडले जाणार आहेत. रोजगार आणि स्थिर आणि मजबूत अर्थव्यवस्था या दोन मुद्यांवर ही निवडणूक लढवली जाणार आहे. भारताचे नेपाळशी धोरणात्मक आणि आर्थिक हितसंबंध आहेत.

# बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री लवकरच लग्न करणार

■ छतरपूर



**मध्य** प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धाम येथील मुख्य पुजारी धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे लवकरच लग्न करणार आहेत. स्वतः बाबा बागेश्वर यांनीच लग्न करणार असे सांगत, लवकरच आनंदाची बातमी मिळेल असे स्पष्ट केले.

धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी सांगितले की, मी लग्न करणार हे निश्चित झाले आहे. लग्नासाठी गुरूंकडून परवानगी मिळाली आहे. याबाबत मी माझ्या आईशीही चर्चा केली असून, योग्य मुलगी शोधण्यास सुरुवात करण्यास सांगितले आहे.

धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे अद्याप अविवाहित आहेत. धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे सामाजिक उपक्रमांमुळेही चर्चेत असतात. महाशिवरात्रीच्या निमित्ताने बागेश्वर धाम येथे २५१ मुलींचा सामूहिक विवाह त्यांनी लावून दिला होता. अनेकदा त्यांना लग्न कधी करणार? असा प्रश्न विचारला जात असे. मात्र ते यापूर्वी या प्रश्नावर टाळाटाळ करत होते. पण यावेळी त्यांनी स्वतःच लग्नाची घोषणा केल्यामुळे त्यांच्या अनुयायांमध्ये उत्सुकता वाढली.

# तृणमूल काँग्रेसची राज्यसभेसाठी मेनका गुरुस्वामींना उमेदवारी

■ कोलकाता

राज्यसभेच्या निवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसने नुकतेच आपले उमेदवार जाहीर केले.विशेष म्हणजे यामध्ये ॲडव्होकेट मेनका गुरुस्वामी यांचा समावेश आहे.या मेनका गुरुस्वामी एलजीबीटीक्यू समुदायातील आहेत. त्या जर निवडून आल्या तर देशाच्या संसदेत जाणाऱ्या त्या पहिल्या एलजीबीटीक्यू सदस्य ठरतील.

गुरुस्वामी यांच्यासह तृणमूलने मंत्री बाबूल सुप्रिओ, पश्चिम बंगालचे माजी पोलीस महासंचालक राजवीर कुमार आणि अभिनेत्री कोयल मलिक यांना उमेदवारी दिली.

गुरुस्वामी सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील आहेत. मानवी रक्षणासाठी त्यांनी योगदान दिले आहे.समलिंगी संबंधांबाबत कलम ३७७ विरोधात त्यांनी केलेल्या न्यायालयीन संघर्षामुळे त्यांची स्वतंत्र ओळख प्रस्थपित झाली आहे.

# बांगलादेशमध्ये डिफॉल्टरला सेंट्रल बँकेचा गव्हर्नर बनवले

■ ढाका

बांगलादेशमध्ये सेंट्रल बँकेच्या नवीन गव्हर्नरच्या नियुक्तीवरून मोठा वाद निर्माण झाला. विरोधकांचा आरोप आहे की तारिक रहमान यांच्या सरकारने एका डिफॉल्टर व्यावसायिकाला सेंट्रल बँकेचा गव्हर्नर बनवले आहे.

बांगलादेश बँकेचे नवीन गव्हर्नर म्हणून मोस्ताकुर रहमान यांच्या नियुक्तीनंतर राजकीय संघर्ष तीव्र झाला. जमात-ए-इस्लामीचे प्रमुख आणि विरोधी पक्षनेते शफीकुर रहमान यांनी सांगितले की, हा निर्णय पंतप्रधानांच्या सांगण्यावरून घेण्यात आला आहे आणि तो सहन केला जाणार नाही.

यापूर्वी सरकारने अहसान हबीब मन्सूर यांचा कार्यकाळ अचानक संपवला होता, ज्यांची नियुक्ती मोहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारने केली होती. मन्सूर यांनी सांगितले की, त्यांनी ना राजीनामा दिला, ना त्यांना हटवल्याची कोणतीही अधिकृत सूचना मिळाली. त्यांना ही बातमी मीडियाद्वारे समजली.



मोस्ताकुर हे गारमेंट उद्योजक होते. कारण आतापर्यंत बांगलादेशात केंद्रीय बँकेचे गव्हर्नर सहसा अनुभवी बँकर, अर्थशास्त्रज्ञ किंवा वरिष्ठ नागरी सेवक असायचे. मोस्ताकुर हे कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट आणि गारमेंट व्यावसायिक आहेत. ते हेरा स्वेटर्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आहेत.

# मुंबईतील पालिकेच्या शिक्षकांवर भटक्या कुत्र्यांची जबाबदारी नाही

■ मुंबई

**बृहन्मुंबई** महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शाळा परिसरात भटक्या श्वानांचा वावर रोखण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपवण्यात आल्याची चर्चा सुरू होती. या मुद्द्यावरून सरकारवर टीकाही होत होती. मात्र, या संदर्भात कोणतेही आदेश देण्यात आलेले नसल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच प्रत्येक शाळेत शिक्षकाला नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचे आदेशही देण्यात आलेले नाहीत, असे त्यांनी सांगितले.

## एकनाथ शिंदेंचा खुलासा

शाळा परिसरातील भटक्या श्वानांच्या नियंत्रणाबाबत शिक्षण विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या नावाखाली नवा प्रयोग केल्याचा आरोप करण्यात आला होता. यासंदर्भात विधानपरिषदेत तारांकित प्रश्न विचारत आमदार अनिल परब, शशिकांत शिंदे आणि इतर सदस्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी खुलासा मागितला होता.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी उत्तरात सांगितले की, शाळा परिसरातील भटक्या श्वानांचा वावर रोखण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपविण्यात आल्याचा आदेश देण्यात आलेला नाही. तसेच प्रत्येक शाळेत शिक्षकांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचे कोणतेही आदेश शिक्षण निरीक्षकांनी काढलेले नाहीत.राज्यातील शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बसथांबे यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी भटक्या श्वानांना हटवून नियोजित निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय यांनी ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सुमोटो याचिकेवर आदेश दिले.

# महिला खेळाडूंसाठी मैदानात स्वच्छतागृहे -चेंजिंग रूम उभारणार

■ मुंबई

**राज्यातील** क्रीडांगणांवर महिला खेळाडूंना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृह, स्वतंत्र चेंजिंग रूम उभारण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री शिंदेनी विधान परिषदेत दिली.

आमदार मिलिंद नार्वेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र लोकायुक्तांच्या निर्देशानुसार ८ जानेवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढून विशेष चौकशी पथक (एआयटी) स्थापन केली. क्रीडांगणांवर महिला खेळाडू व नोकरदार महिलांसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत हे पथक कार्यरत आहे.

# बदलापूर स्त्री बीज विक्री रॅकेटचे राज्याबाहेरही जाळे

■ बदलापूर



बदलापूर येथे स्त्री बीजाच्या अवैध विक्रीचे रॅकेट उघडकीस आले असून तपासात धक्कादायक माहिती समोर येत आहे. एका महिलेकडून १० ते १२ वेळा स्त्री बीज काढल्याचे तपासात उघड झाले. हे रॅकेट केवळ बदलापूर किंवा ठाणेपुरते मर्यादित नसून राज्यभर तसेच राज्याबाहेरही त्याचे जाळे पसरले आहे.

या रॅकेटमध्ये सहभागी महिलांना प्रत्येकी सुमारे १८ ते २५ हजार दिले जात असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रात सोनोग्राफीद्वारे स्त्री बीज तयार झाल्याची खात्री झाल्यानंतर संबंधित महिलांना इतर राज्यांत पाठवून बनावट कागदपत्रे तयार करून त्यांचे स्त्री बीज काढले जात असल्याचेही तपासातून उघड झाले. या प्रकरणात सुलक्षणा गाडेकर या महिलेकडे घरामध्ये स्त्री बीज वाढवण्यासाठी वापरली जाणारी इंजेक्शन्स बेकायदेशीरपणे साठवून ठेवली असल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पोलिसांनी आणखी एका महिलेला अटक केली असून ती उल्हासनगर येथील सोनोग्राफी सेंटरमध्ये काम करत होती. संबंधित महिला सोनोग्राफी करून स्त्री बीज तयार झाले आहे की नाही, याची माहिती देत असल्याचे तपासात समोर आले आहे.

# महादेव मुंडे प्रकरणातील नार्को चाचणी अहवाल न्यायालयात सादर होणार

■ बीड

महादेव मुंडे हत्या प्रकरणातील नार्को टेस्टचा अहवाल विशेष तपास पथकाला देण्यात आला आहे. ब्रेन मॅपिंग आणि नार्को चाचण्यांमधून या हत्येचे सत्य समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यायालयासमोरच हा अहवाल उघड केला जाणार असल्याने प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

२० ऑक्टोबर २०२३ रोजी परळी येथील तहसील कार्यालयासमोर महादेव मुंडे यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला दोन वर्षांहून अधिक काळ उलटला असला तरी मुख्य आरोपींपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले नव्हते. प्रमुख आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. अनेक साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले असून विजयसिंह उर्फ बाळा बांगर याचे तीन वेळा जबाब नोंदवण्यात आले आहेत.

# खार-दांडा कोळीवाड्यातील राखीव जमिनीचा वाद न्यायप्रविष्ट

**मुंबई-** मुंबईत कोळी समाज पिढ्यान्पिढ्या मासे सुकविण्यासाठी वापरत असलेल्या राखीव जमिनीला झोपडपट्टी म्हणून घोषित करण्याच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या आदेशाला मच्छीमार कल्याण संघटनेने आव्हान देत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. खार-दांडा कोळी समाजाची उपजीविका मुख्यत्वे मासेमारीवर अवलंबून असून ती त्यांच्या सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे.

## शिंदेंची माहिती

त्यामुळे या जमिनीवरील अतिक्रमण हटवून मासे सुकविण्याची जमीन पुन्हा मच्छीमारांना द्यावी, अशी मागणी कोळी समाजाने केली आहे.या मुद्द्यावर विधानपरिषदेत आमदारांनी सवाल उपस्थित केला. त्यानंतर या जमिनीचा वाद न्यायप्रविष्ट असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

शिंदे म्हणाले की, मुंबई उपनगरातील खार-दांडा कोळीवाड्यातील शासकीय मालकीच्या जमिनीवरून मासेमारी सहकारी संस्था आणि झोपडपट्टी पुनर्वसन संस्थेमधील वादाबाबत उच्च न्यायालयाने १७ डिसेंबर २०२५ रोजी शासनाने स्वतः हस्तक्षेप करून तोडगा काढण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (नगरविकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतले.

# द्राक्ष वाईनप्रमाणे इतर फळ वाईन उद्योगांनाही प्रोत्साहन मिळणार

■ मुंबई

**राज्यात** द्राक्षांपासून तयार होणाऱ्या वाईन उद्योगांना मिळणाऱ्या मूल्यवर्धित कर (व्हीएटी) परताव्याच्या पार्श्वभूमीवर अन्य फळ वाईन उद्योगांनाही प्रोत्साहन देण्याबाबत शासन स्तरावर विचार सुरू असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. आमदार अतुल भातखळकर यांच्यासह अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, वाईन उद्योग प्रोत्साहन धोरण मुख्यतः द्राक्षावर आधारित वाईन उद्योगांसाठी लागू आहे.

# आयुष्मान भारत योजनेच्या त्रुटींवरून भाजपा आ. मनीषा चौधरी आक्रमक

■ मुंबई

**आयुष्मान** भारत योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटींवरून आज भाजपाच्या आमदार मनीषा चौधरी विधानसभेत आक्रमक झाल्या. सार्वजनिक हितासाठी चालवल्या जाणाऱ्या ट्रस्ट रुग्णालयांमध्ये आयुष्मान कार्डधारकांना लाभ मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी आपल्या सरकारलाच धारेवर धरले.

चौधरी म्हणाल्या की, राज्यातील ५० किंवा त्याहून अधिक खाटांची क्षमता असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयांना आयुष्मान योजनेत सहभागी करून घ्यावे. ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या 'नी रिप्लेसमेंट' (गुडघा प्रत्यारोपण) शस्त्रक्रियेचा आयुष्मान योजनेत पूर्णपणे मोफत समावेश करावा. माझ्या मतदारसंघातील 'करुणा'सारख्या मोठ्या ट्रस्ट रुग्णालयातही आयुष्मान कार्डचा लाभ मिळत नाही. सुपर स्पेशालिटी रुग्णालयांनी नकार दिल्यास गरीब रुग्ण दुर्मिळ आजारांच्या उपचारांपासून वंचित राहतात. पंतप्रधान मोदी यांनी ७० वर्षांवरील नागरिकांना आयुष्मान कार्ड दिले असले तरी रुग्णालयांच्या असहकारामुळे योजनेच्या अंमलबजावणीत अडथळे येत आहेत.

# बंजारा समाजाचा एसटीत समावेश? ६ सदस्यीय समिती

■ मुंबई

**बंजारा** समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीचा सखोल अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या निर्णयामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयानंतर नाराजी व्यक्त करणाऱ्या बंजारा समाजाला काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एसटी समावेशाच्या मागणीसाठी बंजारा समाजाने जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, बुलढाणा आणि जळगाव जिल्ह्यांत मोठे मोर्चे काढले होते. हैदराबाद गॅझेटच्या आधारे समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी होती. याशिवाय, मागणी मान्य न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशाराही देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर सरकारने सकारात्मक भूमिका घेत समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय समिती गठीत केली. समितीत मानववंशशास्त्रज्ञ डॉ. सी. जे. सोनोवाल, समाजशास्त्रज्ञ डॉ. शैलेशकुमार दारोकर, कायदेतज्ज्ञ ॲड. नितीन गांगल आणि विशेष अभ्यासक डॉ. संदिपान गव्हाळे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील सहसंचालक हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

# बविआ कार्यकर्त्याला बेदम मारहाण भाजपा नगरसेवक गणेश पाटील विरोधात गुन्हा

■ वसई

**पालिका** निवडणूकीच्या जय-पराजयाचे पडसाद आजही उमटत आहेत. बविआ पक्षाचा प्रचार केल्याच्या रागातून एका कार्यकर्त्याला भाजप नगरसेवक गणेश पाटील यांनी मारहाण केली. या प्रकरणी पाटील व त्यांच्या कार्यकर्त्यांविरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार रवी झा (३४) बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते असून ते वसई पूर्वेच्या गावराईपाडा येथे राहतात. शुक्रवार २६ फेब्रुवारी रोजी त्यांचा मुन्ना गुप्ता नामाक एका इसमाशी स्थानिक प्रश्नावरून वाद झाला होता. त्यानंतर नगरसेवक गणेश पाटील यांनी त्यांना कार्यालयात बोलावून घेतले. मी निवडणूकीत बविआचे काम केल्याच्या रागातून पाटील आणि ४ ते ५ जणांनी मला मारहाण केल्याचा आरोप झा यांनी केला.


### जाहीर नोटीस

सर्व संबंधित लोकांना कळविण्यात येते की, श्री. राजेंद्रसिंग बोरा, यांच्यातर्फे स्वप्नील घोणे राहणार फ्लॅट नंबर ५, २रा मजला, तसनीम कॉ. ऑप. हौ. सोसायटी, भंगार वाडी, लोणावळा ४१०४०१ राजेंद्रसिंग बोरा खाली नमूद केलेल्या मालमत्तेचे कायदेशीर मालक आहे.

सदर मालमत्तेसंदर्भातील मूळ खरेदीखत दिनांक २२ डिसेंबर १९९५ रोजी निष्पादित करण्यात आले असून ते मावळ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी क्रमांक-मावळ-५३८३/१९९५ अंतर्गत नोंदविण्यात आले होते. हे खरेदीखत मूळ मालक शेवंताबाई दगडू धनवे व इतर आणि पूर्वीचे मालक हेमंत सदानंद पंडित आणि सुनिती बापूजी माळगांवर यांच्यामध्ये करण्यात आले होते. सदर हे मूळ खरेदीखत गहाळ झाले आहे.

मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे
गट क्रमांक: ५२५, क्षेत्रफळ: ७ हे. ६१आर, गांव:शिळीब, तालुका: मावळ, जिल्हा: पुणे. वरील मालमत्तेचा दिनांकाचे मूळ खरेदीखत हरवले असून, शोध घेऊनही ते सापडले नाही. सदर खरेदीखत हरवल्याबाबत लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात हरवलेल्या खरेदीखत/ दस्तऐवजाची एफआयआर नंबर ००२८/२०२६ दिनांक २६/०२/२०२६ तक्रार नोंदविण्यात आली आहे.

ज्यांना सदर हरवलेला मूळ खरेदीखत/ दस्तऐवज सापडला असेल त्यांनी या जाहीर सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत वर दिलेल्या पत्त्यावर संपर्क करा.

दिनांक: २६-०२-२०२६
संपर्क क्रमांक: ९६०७०५३६३१


# काँग्रेस पदाधिकाऱ्याविरोधात बलात्काराचा गुन्हा

■ विरार

**काँग्रेस** पक्षाचा पदाधिकारी शहजाद मलिक (३२) याच्या विरोधात विरारच्या मांडवी पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित तरुणी २२ वर्षांची शिक्षिका असून नालासोपारा मध्ये रहाते. तिने दाखल केलेल्या तक्रारीनुसार, मार्च २०२५ मध्ये आरोपी मलिक यांनी तिला फूस लावून वज्रेश्वरी येथील एका रिसॉर्ट मध्ये नेले. तिथे हात ओढणीने बांधून तिच्यावर बलात्कार केला. यावेळी तिच्या नकळत तिची अश्लील छायाचित्रे काढली. नंतर या छायाचित्रांच्या आधारे तिला वारंवार ब्लॅकमेल करू लागला मार्च २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आरोपी मलिक याने तिला विविध हॉटेल आणि लॉज मध्ये नेऊन बलात्कार केला होता. मलिक विरोधात मांडवी पोलीस ठाण्यात बलात्काराच्या विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी शहजाद मलिक (३२) हा काँगेस पक्षाचा पदाधिकारी आहे. २०२४ मध्ये त्याने काँग्रेस पक्षातर्फे नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती.

# माझ्याकडे बरीच माहिती आहेत तटकरेंचा रोहित पवारांना इशारा



■ बारामती

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर राज्यातील राजकारणात आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आमदार रोहित पवार यांना अप्रत्यक्ष इशारा दिला. माझ्याकडे बरीच माहिती आहे, योग्यवेळी बोलेन, असे सांगत तटकरेंनी रोहित पवारांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले.

बारामती येथे अजित पवार यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन केल्यानंतर तटकरे म्हणाले की, अजितदादा यांच्या स्मृतीस्थळी आज नतमस्तक होण्यासाठी आलो.दादांनी आम्हाला आयुष्यभर ऊर्जा दिली. लोकसेवा शिकवली. विकासाची दृष्टी, व्हीजन समोर ठेवले. माझ्यासोबत पार्थ व जय पवारही होते. रोहित पवारांच्या आरोपावर ते म्हणाले की, कोणालाही आरोप करायचे असतील तर त्यांनी स्पष्टपणे नाव घेऊन बोलावे. अस्पष्ट विधानांमुळे संभ्रम निर्माण होतो. अजित पवार यांच्यासोबतचा माझा चार दशकांचा राजकीय प्रवास असून, अनेक घटनांचे ते साक्षीदार आहेत. दादांबद्दल पूर्वी कोण काय बोलत होते, हे आम्हाला माहिती आहे.

# डहाणूत अदानी प्रकल्पात ९५ टक्के स्थानिकांना संधी

**मुंबई** - डहाणू येथील अदानी समूहाच्या सिमेंट प्रकल्पाविषयी स्थानिक आदिवासींच्या हक्कांवर परिणाम होत असल्याचे प्रश्न उपस्थित झाल्यावर आमदार विनोद निकोले यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे खुलासा मागितला होता. यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी लेखी उत्तर देताना प्रकल्पात स्थानिक कर्मचाऱ्यांचे प्रमाण सुमारे ९५.६८ टक्के असल्याचे सांगितले आणि आरोप फेटाळले.

उदय सामंत म्हणाले की, डहाणू येथील औष्णिक विद्युत केंद्र शासनाने दिलेल्या भोगवटादार वर्ग-२ जमिनीवर उभारले आहे. त्या जमिनीचा वापर शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीनुसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणपत्रानुसार अदानी डहाणू औष्णिक विद्युत केंद्राचा प्रकल्प आगवन येथील गट क्रमांक ३३९ वर कार्यरत आहे.

नवाकाळ

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# हिरानंदानी विकासकाकडून भूखंड मिळवण्यात गैरप्रकार

**सचिन अहिर यांचा आरोप**

मुंबई

**मुंबई** आणि ठाणे परिसरात मे.हिरानंदानी या विकासकाकडून विकासकामांच्या माध्यमातून भूखंड अवैध मार्गाने मिळविले जात असल्याचा गंभीर आरोप उबाठा गटाचे आमदार सचिन अहिर यांनी विधानसभेत केला.

अहिर म्हणाले की, संबंधित विकासकाकडून मुंबई तसेच ठाणे परिसरात निवासी आणि व्यावसायिक वापरासाठी नवनवीन इमारती उभारल्या जात आहेत. या प्रकल्पांसाठी भूखंड अवैध मार्गांचा अवलंब करून मिळविले जात आहेत. ठाण्यातील रहिवासी बाळकृष्ण पोरणेकरांच्या मालकीची जमीन विविध प्रकारचा दबाव आणून स्वतःच्या फायद्यासाठी बळकावण्याचा प्रयत्न होत आहे. यासाठी ठाणे पोलीस आयुक्त, ठाणे पालिकेतील काही वरिष्ठ अधिकारी तसेच इतर शासकीय यंत्रणांना हाताशी धरून पोरणेकरांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न विकासकाकडून केला जात आहे. या विकासकाने यापूर्वीही अनेक शासकीय व खाजगी भूखंड कवडीमोल भावात खरेदी करून नियमबाह्य पद्धतीने गृहनिर्माण प्रकल्प उभारले आणि सदनिका कोट्यवधी रुपयांना विक्री करून जमीनमालक व शासनाची फसवणूक केली होती.

# आटपाडी नगरपंचायतीचा पहिला १०१ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**घरपट्टी, पाणीपट्टीत कोणताही कर नाही**

सांगली

**जिल्ह्यातील** आटपाडी नगरपंचायतीचा पहिला अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला. एकूण १०० कोटी ९७ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पात ग्रामपंचायतप्रमाणे घरपट्टी व पाणीदर स्थिर ठेवला आहे.

या नगरपंचायतीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष यु. टी. जाधव यांनी हा अर्थसंकल्प उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत मांडला. या अर्थसंकल्पास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. मुख्याधिकारी वैभव हजारे यांनी हा अर्थसंकल्प तयार केला आहे. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर नगराध्यक्ष जाधव म्हणाले, हा एक ऐतिहासिक अर्थसंकल्प १०० कोटी ९७ लाख रुपयांचा मांडला आहे. पायाभूत, प्राथमिक सेवा-सुविधा रस्ते, वीज, गटार, व्यापाऱ्यांना सुविधा या अर्थसंकल्पात घेण्यात आल्या आहे. नगरपंचायत क्षेत्रात उत्पादन साधन वाढविण्यासाठी व्यापाऱ्यांना अंशतः कराचा बोजा सहन करावा लागणार आहे.

आजमितीस अडीच ते तीन हजार मालमत्तांची नोंदणी नगरपंचायतच्या रेकॉर्डवर दिसत नाही. त्या रेकॉर्डवर घेण्यासाठी शासकीय एजन्सीच्या मार्फत त्याचा सर्व्हे करून नगरपंचायत कार्यालयातील उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येणार आहे. ग्रामपंचायत काळातील घरपट्टी व पाणीपट्टी नगरपंचायत हद्दीत कायम ठेवली आहे.

# अजित पवारांच्या आठवणीत सुप्रिया सुळेंची भावुक पोस्ट

मुंबई



**राष्ट्रवादी** शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत एक्सवर फोटोसह भावनिक पोस्ट शेअर केली. या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात तसेच कार्यकर्त्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. आज दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला १ महिना पूर्ण झाला. २८ जानेवारी रोजी बारामती येथे अजित पवार यांच्यासह ६ क्रू सदस्यांचा मृत्यू झाला होता. सुप्रिया सुळे यांनी एक्सवर लिहिले की, आपले अजितदादा सोबत नाहीत, हे पचविणे अजूनही कठिण जात आहे. अजितदादांच्या जाण्यामुळे निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन निघणार नाही. दादा, तुम्ही कायम स्मरणात राहाल. तुमच्यासोबतच्या प्रसन्न क्षणांच्या आठवणी आयुष्यभर कायम सोबत राहतील.

# मुरुड आगारात सीएनजी पंप उभारण्याचा प्रस्ताव नाकारला

मुरुड

**जंजिरा-** महानगर गॅस कंपनीने मुरुड एसटी आगारात सीएनजी पंप उभारण्याचा प्रस्ताव नाकारला आहे. यामुळे आगारातील बससेवेचे वेळापत्रक विस्कळीत होत असून प्रवाशांना मोठा फटका बसत आहे. सुमारे चार महिन्यांपासून सर्वेक्षण होऊनही हा निर्णय रखडल्यामुळे स्थानिक नागरिक व प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे.तर दुसरीकडे आगारात सीएनजीची सुविधा नसल्याने एसटी बससेवेवर मोठा परिणाम होत आहे.

मुरुड आगारात सध्या ७ नवीन बसेस वगळता उर्वरित सुमारे ३० बसेस सीएनजीवर



धावत आहेत. गॅस भरण्यासाठी अलिबाग येथे जावे लागत असल्याने वेळेचे नियोजन करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी असंख्य प्रवाशांना ताटकळत बसावे लागते. त्यामुळे मुरुड आगाराच्या सीएनजी पंपासाठीचा प्रस्ताव महानगर गॅस लिमिटेडकडे पाठविण्यात आला होता. मात्र केवळ ३० गाड्यांसाठी स्वतंत्र पंप देणे शक्य नसल्याचे कारण देत कंपनीने प्रस्ताव नामंजूर केला असल्याचे पेण येथील विभाग नियंत्रक चौरे यांनी सांगितले. दरम्यान, मुरूड तालुक्यात केवळ एसटी बसेसच नव्हे तर अनेक खासगी वाहनेही सीएनजीवर धावत असल्याने गॅस कंपनीने संपूर्ण तालुक्याचा विचार करणे आवश्यक असल्याचे मत प्रवासी व्यक्त करत आहेत.

# वसई-विरार पालिकेमध्ये ५ मार्चला स्थायी समिती सभापती निवड



वसई

**वसई-विरार** महापालिकेच्या महापौर, उपमहापौर, सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता निवडीनंतर आता सर्वांचे लक्ष स्थायी सभापतीच्या निवडीकडे लागले आहे. स्थायी समितीच्या सभापती पदाची निवड ही येत्या ५ मार्चला होणार आहे. त्यामुळे सभापतीपदी कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वसई-विरार महापालिकेच्या सर्वात महत्त्वाच्या असणाऱ्या स्थायी समिती सदस्यांची निवड २० फेब्रुवारीला पार पडलेल्या पहिल्या महासभेत करण्यात आली होती. यावेळी १६ सदस्यांची निवड झाली होती. त्यामध्ये बविआच्या १० तर भाजपाच्या ६ नगरसेवकांचा समावेश आहे. ही सभापती निवड १६ सदस्यांमधून खुल्या मतदान पद्धतीने केली जाणार आहे.

त्यासाठी ५ मार्च पीठासन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन केले आहे. त्याआधी २७ फेब्रुवारी रोजी महापालिका मुख्यालयातील नगरसचिव कार्यालयात नगरसचिव विश्वनाथ तळेकर यांच्याकडे बविआतर्फे स्थायी समिती सदस्य तथा माजी महापौर प्रवीण शेट्टी यांनी सभापती पदासाठी अर्ज दाखल केला. तर भाजपाकडून स्थायी समिती सदस्य निलेश चौधरी यांनी सभापतीपदासाठी आपले नामनिर्देशनपत्र सादर केले आहे.

# मार्च महिन्यात ११ दिवस बँकांचे कामकाज बंद

**मुंबई -** मार्च महिन्यात विविध सण आणि नियमित सुट्ट्यांमुळे बँका तसेच काही सरकारी कार्यालयांचे कामकाज एकूण ११ दिवस बंद राहणार आहे. होळी, धुलिवंदन, गुढीपाडवा, रमजान ईद आणि रामनवमी आदी सणांच्या पार्श्वभूमीवर राज्यनिहाय सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. मार्च महिन्यात १, ८, १५, २२ आणि २९ मार्च या पाच रविवारी नियमित साप्ताहिक सुट्टी राहील. याशिवाय १४ आणि २८ मार्च रोजी दुसरा व चौथा शनिवार असल्यानेही बँका बंद राहतील. सणांच्या सुट्ट्यांमध्ये ३ मार्च रोजी धुलिवंदन, १९ मार्च रोजी गुढीपाडवा, २१ मार्च रोजी रमजान ईद आणि २६ मार्च रोजी रामनवमी या निमित्ताने बँकांचे कामकाज बंद राहणार आहे.

# अविमुक्तेश्वरानंदांना लैंगिक शोषण प्रकरणात अटकेपासून दिलासा

वाराणसी

**अल्पवयीन** बटूच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांप्रकरणी शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांना उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला. यावेळी पोलिसांनी पुढील सुनावणीपर्यंत कोणतीही कठोर कारवाई करू नये. त्यामुळे पुढील सुनावणी मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात होईल. तोपर्यंत त्यांना याप्रकरणात अटकेपासून तात्पुरते संरक्षण देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

तक्रारदार आशुतोष ब्रह्मचारी यांनी धार्मिक शिक्षणासाठी आश्रमात राहणाऱ्या एका बटूवर लैंगिक शोषण झाल्याचा आरोप केला होता. या तक्रारीनंतर पोलिसांनी संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. प्रकरण संवेदनशील स्वरूपाचे असल्याने तपास यंत्रणांनी पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली. यादरम्यान शंकराचार्यांना चौकशीसाठी नोटीस देण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी अटक टाळण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली. सुनावणीदरम्यान अविमुक्तेश्वरानंदांनी आरोप फेटाळून लावत तक्रारीतील अनेक बाबींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लैंगिक शोषणाचे आरोप द्वेषातून लावले आहेत, संबंधित घटनेचे कोणतेही अस्तित्व नाही. या घटनेची उशिरा एफआयआर दाखल झाल्याने संशय निर्माण होत आहे.

संबंधित बटू कधीही शंकराचार्यांच्या आश्रमात राहात नव्हते, तसेच त्यापैकी एक सज्ञान असल्याची मार्कशीट सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने तत्काळ अटकेची गरज नसल्याचे नमूद करत स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांना अंतरिम दिलासा दिला.

# कारखाने व आस्थापनांमधील तासवाढीचा निर्णय स्थगित

मुंबई

**राज्यातील** कारखान्यांमध्ये कामाचे दैनंदिन तास ९ वरून १२ तास करण्याचा निर्णय सप्टेंबर २०२५ मध्ये घेतला होता, तर दुकाने व आस्थापनांमध्ये कामाचे तास ९ वरून १० करण्याचा प्रस्ताव होता. यावर आमदार नितीन राऊत, संजय केळकर आणि रोहित पवार यांनी सरकारकडे खुलासा मागितला. यावर लेखी उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दैनंदिन कामाची मर्यादा ८ तास निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती दिली.

कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले की, कारखाने व आस्थापनांमधील दैनंदिन कामाची मर्यादा आता ८ तास निश्चित करण्यात आली आहे. आठवड्याच्या कमाल ४८ तासांच्या मर्यादेमुळे कामगारांचे हक्क अबाधित राहतील आणि अतिकालिक कामासाठी कामगाराची लेखी संमती घेणे बंधनकारक आहे.

# आज लोकल रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक

मुंबई

**विविध** यांत्रिकी, अभियांत्रिकी आणि देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी उद्या रविवार १ मार्च रोजी मुंबईतील रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मध्य हार्बर आणि पश्चिम अशा तिन्ही लोकल रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक घोषित केला आहे. मध्य रेल्वेवर सीएसएमटी-विद्याविहार हार्बरवर कुर्ला-वाशी आणि पश्चिम रेल्वेवर चर्चगेट-मुंबई सेंट्रल दरम्यान सकाळी १०.३५ ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत सेवा प्रभावित राहतील. गाड्या १५-२० मिनिटे उशिराने धावतील. तसेच अनेक लोकल रद्द राहतील.

मध्य रेल्वे मार्गावर सीएसएमटी ते विद्याविहार मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर सीएसएमटी ते विद्याविहार दरम्यान अप आणि डाऊन धिम्या मार्गावर सकाळी १०.५५ ते दुपारी ४ वाजेपर्यंत ब्लॉक असेल. या काळात धिम्या मार्गावरील गाड्या जलद मार्गावर वळवण्यात येतील. परिणामी मशीद बंदर, सँडहर्स्ट रोड, चिंचपोकळी आणि करी रोड या स्थानकांवर लोकल थांबणार नाहीत. हार्बर रेल्वे मार्गावर कुर्ला ते वाशी दरम्यान सकाळी ११.१० ते सायंकाळी ४.१० वाजेपर्यंत ब्लॉक असेल. या काळात सीएसएमटी ते वाशी/बेलापूर/पनवेल दरम्यानची सेवा पूर्णपणे रद्द राहील.

# वरळी जेट्टी हेलिपॅड रेमंड समूह उभारणार

मुंबई

**मुंबईतील** वरळी जेट्टी येथे हेलिपॅडची उभारणी करणे आणि त्याचे संचालन करणे या कामासाठी मुंबई महानगरपालिकेने रेमंड समूहाची निवड केली आहे. हा प्रकल्प सरकार-खासगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) राबवण्यात येणार आहे.

यासंबंधी मुंबई पालिका आणि रेमंड समूह यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार रेमंड समूह वरळी जेट्टीची पुनर्बांधणी करणार असून या ठिकाणी हेलिपॅड उभारणार आहे. या प्रकल्पातील सर्व बंधनकारक स्थापत्यशास्त्रीय बदल, सुरक्षा सुविधांचे आधुनिकीकरण आणि परिचालनाशी संबंधित



सुविधांची निर्मिती रेमंड समूहाला करावी लागणार आहे. या हेलिपॅडला नागरी हवाई उड्डाण महासंचलनालयाची (डीजीसीए) मान्यता मिळाली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, वरळी जेट्टी ही सुरुवातीला तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आली होती. मात्र आता या ठिकाणी हेलिपॅड उभारण्यात येणार असल्याने जेट्टीचे कायमस्वरूपी अद्ययावतीकरण करावे लागणार आहे. आर्थिक आघाडीवर करारामध्ये रेमंड समूहाने हेलिपॅडच्या परिचालनातून मिळणाऱ्या उत्पन्नातील पन्नास टक्के हिस्सा किंवा दरमहा चार लाख रुपये यापैकी जी जास्त असेल ती रक्कम पालिकेला देण्याचे मान्य केले आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गर्भाशयाच्या कर्करोगाविरुद्ध राष्ट्रीय एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ केला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल व इतर मान्यवरांनी ऑनलाईन उपस्थिती लावली. (छाया - दीपक साळवी)

# बारावी परीक्षेत स्पीकरवरून उत्तरे सांगितली

नांदेड

**नांदेड** जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथे बारावी परीक्षेदरम्यान भोंग्यावरून विद्यार्थ्यांना उत्तरे सांगितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. बारावीच्या जीवशास्त्र आणि इतिहासाच्या परीक्षेदरम्यान प्रश्नांची उत्तरे थेट भोंग्याद्वारे (स्पीकरद्वारे) विद्यार्थ्यांना सांगण्यात आली.

स्व. संगीतादेवी उच्च माध्यमिक विद्यालय आश्रमशाळा येथील परीक्षा केंद्र क्रमांक २०७ वर हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी सिंदखेड पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर शिक्षण मंडळ यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत संस्थेकडून लेखी खुलासा मागितला आहे. मंडळाच्या सचिव अनुपमा भंडारी यांनी संस्थेला नोटीस दिल्याची माहिती दिली. या परीक्षा केंद्राच्या भिंतीलगत प्राथमिक आरोग्य केंद्राची जुनी इमारत आहे. याच इमारतीवरून अज्ञात व्यक्तीने भोंग्याद्वारे विद्यार्थ्यांना उत्तरे सांगितल्याचे समोर आले आहे.

विशेषतः वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे सांगण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. हा प्रकार केंद्र संचालक सुखदेव थोरात यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल केली.

# आंध्र प्रदेशात फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट! १८ ठार

**मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता**

काकीनाडा

**आंध्र** प्रदेशमधील काकीनाडा जिल्ह्यातील फटाक्यांच्या कारखान्यात आज भीषण स्फोट झाला, ज्यात सध्या १८ जणांचा मृत्यू झाला. स्फोटानंतर लागलेल्या आगीत अनेक जखमी झाले असून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे. घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून मृतांचा आकडा अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

स्फोट काकीनाडा जिल्ह्यातील समरलाकोटा विभागातील वेट्टलापलेम-जी. मेदुपाडू परिसरात असलेल्या फटाक्यांच्या कारखान्यात झाला. प्राथमिक माहितीनुसार, स्फोट इतका तीव्र होता की, काही कामगारांचे मृतदेह शेकडो फूट अंतरावर शेतात फेकले गेले. कारखान्यात मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य साठवलेले असल्याने आगीने काही वेळातच भीषण रुप धारण केले. अपघाताच्या वेळी कारखान्यात सुमारे ३० कामगार काम करत होते, त्यामुळे अनेकांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही, अशी प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि मोठ्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

# मुंबईकरांसाठी गारगाई धरण चार गावांचे पुनर्वसन करणार

**कुटुंबाला १२ लाख मोबदला मिळणार**

मुंबई

**मुंबईतील** वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता ३ हजार १०५ कोटींच्या गारगाई धरण प्रकल्पाला वेग देण्याचा निर्णय मुंबई पालिका प्रशासनाने घेतला आहे. या प्रकल्पातील बाधित ४ गावांचे पाच किलोमीटर अंतर परिसरात पुनर्वसन केले जाणार असून बाधित कुटुंबांना १० ते १२ लाखांचा मोबदला दिला जाणार असून या धरणाचे काम मार्चपासून सुरू होणार असल्याची माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले की, या प्रकल्पातून मुंबईला दररोज ४४० दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पात चार गावे बाधित होणार असून त्या गावांचे वाडा तालुक्यातील देवळी गावात ३३४ हेक्टर जमिनीवर पुनर्वसन करण्यात येणार आहे. तर तीन लाख झाडे तानसा धरणाजवळ ५ किलोमीटर अंतरावर पुनर्रोपित करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे या प्रकल्पांतर्गत चंद्रपूर, हिंगोली, वाशिम जिल्ह्यात ६५८ हेक्टर जमिनीवर नवीन झाडे लावली जाणार असून यासाठी वन विभागाची परवानगी मिळाल्यानंतर झाडांचे पैसे देण्यात येणार आहेत. तसेच प्रकल्पात बाधित कुटुंबांना भूसंपादन कायद्यानुसार १० ते १२ लाख रुपये आणि कुटुंबातील एका व्यक्तीला पालिकेत नोकरी देण्यात येणार आहे.

# २०४७ पर्यंत सिकलसेल उच्चाटन राज्य सरकारचे विशेष अभियान

मुंबई

**राज्यात** वाढत्या सिकलसेल ॲनिमिया या अनुवंशिक आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने विशेष अभियान हाती घेतले आहे. यानुसार २०४७ पर्यंत सिकलसेल आजाराचे समूळ निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासंदर्भात आमदार संतोष दानवे यांच्यासह आमदारांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना सरकारकडून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सविस्तर भूमिका स्पष्ट केली.

प्रकाश आबिटकर यांनी नमूद केले की, राज्यातील २१ जिल्हयांमध्ये सध्या एकूण २२,५८६ सिकलसेल रुग्ण व २,२३,२२३ सिकलसेल वाहक आहेत. केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन मिशन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. ज्याद्वारे २०४७ पर्यंत सिकलसेल आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचा उद्देश आहे.

या कार्यक्रमांतर्गत ० ते ४० वयोगटातील नागरिकांची मोफत तपासणी, निश्चित निदान, समुपदेशन, औषधोपचार, रक्त संक्रमण तसेच प्रसूतिपूर्व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

# पालघरमध्ये दगड खाणीत बुडून दोन मुलांचा मृत्यू

**बोईसर -** पालघर जिल्ह्यातील बोईसर जवळील मनोर परिसरात बंद पडलेल्या दगड खाणीत पोहण्यासाठी गेलेल्या दोन अल्पवयीन मुलांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील मस्तान नाका उड्डाणपूल परिसरातील टाकवहाल भागातील खाणीत ही घटना घडली. या घटनेत जिग्नेश विजय पवार (८) याचा मृतदेह अग्निशमन दलाने पाण्याबाहेर काढला आहे. तर आयुष मुकेश पवार (१५) याचा शोध उशिरापर्यंत सुरू होता. दोन्ही मुले इतर एका मुलासोबत खाणीत साचलेल्या पाण्यात आंघोळीसाठी गेली होती.

# राज्यातील कापूस खरेदीला १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

पुणे

**भारतीय** कापूस महामंडळाने कापूस खरेदीला अखेर मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे अडचणीतील कापूस उत्पादकांना दिलासा मिळणार आहे. राज्यात १५ मार्चपर्यंत कापूस खरेदी करण्यात येणार आहे.त्यामुळे शेतकरी सोईनुसार स्लॉट बुक करून हमीभावाने कापूस विक्री करू शकतील, अशी माहिती भारतीय कापूस महामंडळाचे अध्यक्ष ललितकुमार गुप्ता यांनी दिली.

भारतीय कापूस महामंडळाने हमीभावाने कापूस खरेदी काल शुक्रवारपासून बंद करण्याचा निर्णय घेतला होता. पण शेतकऱ्यांकडे अद्याप मोठ्या प्रमाणात कापूस शिल्लक असल्याने मुदतवाढीची



मागणी केली जात होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री गिरीराज सिंह यांना पत्र लिहून ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. मात्र २७ फेब्रुवारी सायंकाळपर्यंत कापूस मुदतवाढीसंदर्भात निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यामुळे दिवसभर बाजारात वेगवेगळ्या चर्चा सुरू होत्या. शेतकऱ्यांमध्येही संभ्रमही तयार झाला होता. अनेक भागातील शेतकऱ्यांकडे अद्यापही ३० टक्क्यांपर्यंत कापूस शिल्लक असल्याचे शेतकरी सांगत आहेत. हे शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली होती. पण काल शुक्रवारी सायंकाळी मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला, त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.


# वरळी-शिवडी उन्नत मार्गाच्या कामावेळी लोखंडी रॉड कोसळला! एक जखमी

मुंबई

**मुंबईत** सुरू असलेल्या वरळी-शिवडी उन्नत मार्गाच्या बांधकामादरम्यान अपघात झाला. काम सुरू असताना पुलावरील लोखंडी रॉड अचानक एका व्यक्तीच्या डोक्यावर पडल्याने तो गंभीर जखमी झाला. जखमी व्यक्तीवर सध्या जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर या घटनेप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वर्दळीच्या रस्त्यालगत उन्नत मार्गाचे पिलर उभारणीचे काम सुरू होते. यावेळी वरून लोखंडी साहित्य खाली पडल्याने परिसरात खळबळ उडाली. अपघात घडलेल्या ठिकाणी नागरिकांची मोठी वर्दळ असून शाळकरी मुले व पादचारी नियमितपणे या मार्गाचा वापर करतात. या घटनेनंतर संबंधित कंत्राटदार आणि कामगारांच्या निष्काळजीपणाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही दिवसांपूर्वी मुलुंड परिसरात मेट्रो प्रकल्पाचा स्लॅब कोसळल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा अशा प्रकारचा अपघात घडल्याने मुंबईतील सुरू असलेल्या पायाभूत प्रकल्पांच्या सुरक्षेविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. शहरात विविध ठिकाणी मेट्रो आणि उड्डाणपुलांची कामे वेगाने सुरू असली तरी सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१५३४



**आडवे शब्द –**

१. महादेव, शंकर ५. जगाची रीत ८. हस्त, हात १०. जास्वंदीचे फूल १२. बाणांची पिशवी १३. रायगडावरचा प्रसिद्ध कडा १६. सल्ला १९. हौतात्म्य २२. थोर २३. लिंबाच्या वर्गातले मोठे व गोड फळ २४. रावण २८. भारतीय सैनिक २९. दमयंतीचा नवरा ३०. संगतीने, बरोबर ३१. कपर्दिक ३२. नावाची पाटी ३४. सतेज, तेज:पुंज ३६. श्रीकृष्ण ३८. साहेबी डगला ३९. त्वरित ४१. केर काढण्याचे एक साधन ४२. हिंमत ४४. वजन मोजण्याचे साधन ४६. स्तंभ ४८. बिचारा, बापडा ५०. निरंतर, सतत ५३. दहशत ५५. भाजलेली ज्वारी, मका वगैरे ५६. अभिमन्यूचा मुलगा ५७. कामात बुडालेला ५८. विचार, हेतू, बेत ६०. तांब्या ६२. कमी होणे ६३. कर्ण ६४. मूर्ख माणूस, गद्धा ६५. मोठी गर्दी ६६. भीतीने सुटलेले कापरे ६८. संकोची स्वभावाचा ६९. शक्तिशाली ७१. मार्शल आर्टसचा जपानी प्रकार ७२. प्रवेश, शिरकाव ७४. ओटा, चबुतरा ७५. वाकळ, गोधडी ७६. टिंगल ७८. वरणाची केशरी डाळ ७९. ओंकार, मुलांचे एक नाव ८०. नृत्य ८१. बाग, वाटिका ८२. धृतराष्ट्राला युद्धाचे वर्णन सांगणारा ८४. रवी, सूर्य ८७. अशुद्ध रक्तवाहिनी ८९. समीक्षा ९१. अधोगती ९२. जुगार ९३. बहाणा, खोटे कारण ९४. गुरांचे अन्न, चारा ९६. अश्वारूढ ९७. पाण्याचा कालवा ९८. शुष्कता ९९. विक्री १००. वर्तुळ, रिंगण १०१. नवरी १०२. प्रवासी वाहतुकीचे मोठे वाहन १०३. अपुरा १०५. घराणे, खानदान १०६. धूमधडाक्यात समारंभ करणे १०८. शैली, ढब १०९. रानटी, जंगली ११०. प्रकाशाची तिरीप १११. वायर ११२. घोड्याची निगा राखणारा सेवक

**उभे शब्द –**

१. सदस्य २. देणारा, दानी ३. वशिला, लग्गा ४. दृढ, पक्का ६. बोभाटा, बभ्रा ७. हद्दत ८. गाठोडे ९. अफवा ११. वडाच्या झाडाचे एक वैशिष्ट्य १४. जल्लोष १५. काव्य करणारा १६. राजवाडा १६. अंधार दूर करणारा, सूर्य १८. रामाच्या वानरसेनेचा प्रमुख २०. परीट २१. बोजवारा, बोऱ्या २२. स्वच्छंदी २५. गाडा २६. पिता २७. यशस्वी ३०. लिहिताना कागदावर डावीकडे सोडलेली जागा ३३. शेजारी ३५. सीतेला वाचवताना मरण ओढवलेला पक्षी ३६. गुपित ३७. पुष्परस गोळा करणारा कीटक ३८. जाळे विणणारा कीटक ४०. इंद्रियांना जाणवणारे ४१. खारकेचे पूर्वरूप ४३. खोगीर, पालाण ४५. सुकुमार, देखणा ४७. पळस ४८. करंजीचे, मोदकाचे आवरण ४९. कालव्याचे किंवा पाटाचे पाणी आत घेऊन बांधलेला हौद किंवा विहीर ५०. टोक ५१. पृथ्वी, वसुधा ५२. फिकीर ५४. वटवट ५६. फेटा ५७. वेदना ५९. भाग्य ६१. माळ ६२. पक्ष्यांचे निवासस्थान ६४. फुलांचा अलंकार ६६. रोमांच ६७. लग्न ६८. लत्ताप्रहार ६९. परंपरा, रिवाज ७०. अस्थिर ७१. चूक ७३. आघात ७४. जिज्ञासू ७५. कलावंतीण ७७. गोळा ७९. जन्म, उत्पत्ती ८२. भक्तिमार्गाची शिकवण देणारे सत्पुरुष ८३. डाग ८५. विस्मरण ८६. तात्काळ ८८. बाधा, संसर्ग ९०. हेकट ९१. पारतंत्र्य ९२. खास पाहुणचार ९५. अरण्य ९६. वेगाने केलेली प्रगती ९८. नाजूक ९९. मुक्काम १०४. तोरा, तोल १०७. ज्याप्रमाणे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५३३ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. नाममात्र ५. चीत ७. उदरभरण ११. फुशारकी १२. कायदा १४. सेनादल १६. याग १८. फार १९. नटी २०. स्थगिती २२. गया २३. ऋण २४. वाख २५. भाऊ २७. नारद २९. चकित ३१. मटार ३३. येथवर ३४. कायापालट ३६. गुहा ३७. बोलावणे ३९. हेम ४०. लीन ४२. ताप ४३. इंगित ४४. टारगट ४७. कालिदास ४९. बारसे ५२. वतनदार ५५. खाबू ५६. तूर्त ५७. अदमास ५८. बकासुर ६०. नजीक ६२. घटना ६३. डझन ६७. ढगळ ६८. लवकर ७०. मग ७२. पाम ७३. पाहुणेर ७५. माठ ७७. पोचा ७८. टाकोटाक ८०. तारू ८१. राठ ८२. पंच ८३. तरल ८४. हत्ती ८५. पसा ८८. शिवी ८९. जाच ९०. लोड ९१. कासरा ९४. फाकडा ९६. मन ९८. तालीम ९९. गुबगुबीत १००. वर्ज्य १०१. टरफल १०३. फोल १०४. सवाल १०५. हेवा १०६. डवरा १०८. परजीवी १११. डाकीण ११२. ताणतणाव ११३. जथा

**उभे शब्द :** १. हुशार २. नाकी नऊ येणे ३. माका ४. त्रयस्थ ६. तसे ७. उदयाचल ८. दल ९. भयाण १०. रग ११. फुफाटा १३. दागिना १५. नाग १७. साखरझोप २१. तीरकामटा २३. ऋत २४. वाटा २६. सावधगिरी २८. दया ३०. किटली ३१. महा ३२. शिला ३५. पारंगत ३७. बोजा ३८. वजीर ४१. नकार ४२. तास ४५. रवसड ४६. टन ४८. दात काढणे ४९. बाबूजी ५०. सेतू ५१. बदनाम ५३. दारा ५४. झुरळ ५५. खानसामा ५७. अट ५९. सुगरण ६१. कल ६२. घरपोच ६४. झपाटा ६५. नमकहराम ६६. सपाता ६९. वक्ष ७१. गटार ७४. हुरूप ७६. ठरावीक ७९. कोलकाता ८२. पंचम ८३. तडकाफडकी ८६. सानेगुरुजी ८७. तरतरी ८८. शिफारस ९२. सलीम ९३. चांगूलपणा ९५. डावलणे ९७. नटवा १०२. लवण १०५. हेला १०७. स्रैण १०९. रव ११०. वीज




# राशिभविष्य

**रविवार ०१/०३/२०२६ ते शनिवार ०७/०३/२०२६**

## मेष

**आठवड्याचा** उत्तरार्ध तुमच्यासाठी चांगला ठरणार आहे. राशी स्वामी मंगळ कुंभ राशीमध्ये इतर ग्रहांबरोबर आहे. आठवड्याच्या सुरुवातीला मानसिक अस्थिरता व भय राहील. स्थिर मनाने निर्णय घेऊन कामावर लक्ष केंद्रित करा. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. राग व अति आत्मविश्वास नियंत्रणात ठेवल्यास अनेक गोष्टी मार्गी लावू शकाल. काही धाडसी निर्णय घेतले जातील. अचानक धनलाभाचे योग आहेत.

कुटुंबामध्ये तप्त वातावरण राहू शकते. छोट्या छोट्या कारणामुळे मतभेद होतील. संयम ठेवा. जोडीदार व तुमच्यामध्ये समन्वय राहील. संततीची प्रगती समाधान देणार आहे. भावंडांशी वादविवाद टाळावेत. उद्योगव्यवसायात भागीदारीत पारदर्शक व्यवहार ठेवा. तुमच्या धाडसी कल्पना प्रत्यक्षात आणता येतील. संयमित नेतृत्वगुणाचा उपयोग होईल. स्पर्धक व हितशत्रूंच्या हालचाली ओळखून त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येईल. स्वतःच्या क्षमता ओळखून त्याप्रमाणे निर्णय घ्यावेत.

**शुभ दिनांक :** ५, ६, ७.

## वृषभ

**आठवड्याची** सुरुवात व अखेर तुमच्यासाठी समाधानकारक असेल. धावपळ वाढली तरीही ती फायद्याची असणार आहे. अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. तुमच्या कष्टाला, प्रयत्नांना योग्य दिशा द्यावी. पूर्ण माहिती व अभ्यासानंतर निर्णय घ्यावे व त्यावर ठाम राहावे. भाग्याची साथ असल्यामुळे यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. बचतीचा मार्ग सोडू नका. मन भरकटणार नाही याकडे लक्ष द्यावे.

घरामध्ये उत्साही वातावरण राहील याची काळजी घ्या. तुमची आक्रमक भूमिका नियंत्रणात ठेवा. सर्वांना बरोबर घेऊन पुढे जावे लागेल. घरातील ज्येष्ठांचा मान राखावा. जोडीदार, संतती यांची तुमच्या कार्यात मदत राहील. मौजमजा करताना कामाकडे दुर्लक्ष होऊ शकते.

कार्यक्षेत्रामध्ये तुम्हाला यश मिळेल. नवीन कल्पना यशस्वी झाल्यामुळे मान मिळेल. आर्थिक लाभाचेही योग आहेत. मात्र कुठेही चूक झाल्यास मान्य करून त्यावर उपाययोजना करावी. अतिधाडसी वृत्ती घातक ठरेल. व्यावसायिकांचे अडकलेले पैसे मिळू शकतात.

**शुभ दिनांक :** १, ७.

## मिथुन

**हा** आठवडा धावपळीचाच आहे. संघर्षातून यशाचा मार्ग दिसत आहे. आर्थिक अडचणी आल्या तरी त्यातून मार्ग काढता येईल. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. खर्चावर नियंत्रण ठेवा. प्रयत्नाला भाग्याची साथ मिळणार आहे. नियोजनपूर्वक कृती करा. निर्णय घेण्यास त्रास होत असेल, गोंधळ होत असेल तर तज्ज्ञ व अनुभवी, विश्वासू व्यक्तीचा सल्ला घ्यावा.

नवीन नात्याची सुरुवात होईल. विवाहाची बोलणी पुढे सरकतील. मात्र भावनेच्या भरात व घाईगडबडीने निर्णय घेऊ नये. मातेच्या आरोग्याची काळजी घ्या. संततीशी योग्य तो संवाद साधून त्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांना यश येईल. भावंडांशी गैरसमज टाळावेत.

कार्यक्षेत्रामध्ये तुमचे व्यवहार पारदर्शक ठेवावे. मात्र तुमच्या हालचाली, योजना गुप्त ठेवा. व्यावसायिकांना कष्टाने यश मिळेल. नोकरदारांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये. नियमांचे काटेकोर पालन करावे. परदेशाशी संबंधित व्यवसाय, कार्यक्षेत्र असल्यास यश मिळेल.

**शुभ दिनांक :** १, ७.

## कर्क

**चढउतार** असलेला हा आठवडा आहे. सध्या तुमच्यासाठी संमिश्र ग्रहमान आहे. अत्यंत भावनाशील अशी तुमची रास आहे. परंतु व्यावहारिक निर्णय घेणे आवश्यक ठरणार आहे. कामामध्ये संयम व सातत्य गरजेचे आहे. ठोस निर्णय घेऊन अडथळे पार करावे. हाती घेतलेले काम नियोजित वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्या. आर्थिक अडचणी येऊ नये म्हणून योग्य ते नियोजन करावे लागेल.

कुटुंबामध्ये सध्या कुठलेही मोठे निर्णय शक्यतो पुढे ढकलावे. बोलताना स्पष्टपणे परंतु सौम्य शब्द वापरावेत. विनाकारण गैरसमज, चिंता वाढणार नाही याची काळजी घ्या. जोडीदाराची मदत, सल्ला, अनुभव महत्त्वाचा ठरेल. कुटुंबासहित प्रवासाचे योग आहेत. उद्योगधंद्यात नियमांचे पालन करावे. नवीन व्यवहार करताना अडथळे पार करावे लागले तरी यश मिळेल. परिस्थितीनुसार निर्णय बदलावे लागतील त्यासाठी लवचिक धोरण ठेवावे. सहकारी वर्गावर अवलंबून राहू नका. तुमच्यातील स्वतंत्र वृत्तीला सध्या बंधन घालावे लागेल. निर्णय घेताना पूर्ण माहिती घेतल्याशिवाय पुढे जाऊ नये.

**शुभ दिनांक :** १, ५, ६.

## सिंह

**या आठवड्याच्या** प्रारंभी काही गोष्टी तुम्हाला त्रासदायक ठरू शकतील. स्वतःच्या क्षमतेबद्दल शंका बाळगू नका. तसेच अहंकार येऊ देऊ नका. तुम्ही विपरीत परिस्थितीमधूनही मार्ग नक्की काढाल व यश मिळवाल. चिंता करत बसण्यापेक्षा नियोजनबद्ध कृतीला महत्त्व द्यावे. आर्थिक व्यवहार जपून करा. अनावश्यक खर्च टाळावेत.

संतती काही कारणामुळे दूर असली तरी त्यांची प्रगती समाधान देईल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्या तसेच त्याचे मत दुर्लक्षित करू नका. तुमचे मानसिक स्थैर्य खूप महत्त्वाचे ठरणार आहे. कुटुंबाचा एकत्रित व्यवसाय असल्यास पारदर्शक व्यवहार ठेवावे. कुटुंबाबरोबर प्रवासाचे आयोजन होईल.

कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या नव्या योजना प्रत्यक्षात आल्यामुळे तुम्हाला लाभ होतील. स्पर्धात्मक परिस्थितीला तोंड द्यावे लागणार आहे. तुमची कार्यशक्ती योग्य पद्धतीने वापरावी. व्यावसायिकांना संधी मिळतील. पूर्ण माहिती घेतल्याशिवाय पुढे जाऊ नये.

**शुभ दिनांक :** ५, ७.

## कन्या

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. एकंदरीत हा आठवडा संघर्षाचा आहे. मन शांत ठेवून मनोबल उंचावून निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रतिस्पर्धी, शत्रू यांचे डावपेच ओळखून तुम्हाला तुमचे धोरण आखावे लागेल. मंगळाचा राशीबदल अडचणी वाढवू शकेल. आवश्यक तिथेच आक्रमक भूमिका घ्या. आर्थिक स्थिती चांगली राहील. आर्थिक गुंतवणूक मात्र पुढे ढकलावी. कोर्टकचेरी, सरकारी काम यात अडथळा येऊ नये यासाठी सावधगिरी बाळगावी.

कुटुंबाची साथ चांगली मिळेल. सुसंवाद ठेवल्यास गैरसमज करतील. संततीकडे मात्र विशेष लक्ष द्यावे. भावंडांशी सामंजस्य ठेवा. मित्रपरिवाराची मदत मिळेल. वादविवाद मात्र टाळावेत.

कार्यक्षेत्रामध्ये तुमचे महत्त्व, क्षमता सिद्ध होईल. नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. कुठल्याही मोहाला बळी पडू नका. मदतनिसांवर लक्ष ठेवावे लागेल. नोकरदारांनी विशेष सावधगिरी बाळगावी. सहकारी, वरिष्ठ यांच्यावर अवलंबून राहू नका. आरोग्याची काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** १, ५, ६.

## तूळ

**एकंदरीत** हा आठवडा तुमच्यासाठी चांगला जाईल. तुम्ही केलेल्या, करत असलेल्या प्रयत्नांना यश मिळेल. तुमच्या महत्त्वाकांक्षा, इच्छा वाढणार आहेत. मात्र त्यांना योग्य दिशा मिळणे तसेच प्राधान्यक्रम ठरवणे आवश्यक आहे. योग्य वेळेत निर्णय घेऊन कृतीला प्राधान्य द्यावे. लाभाचे प्रमाण वाढणार असले तरीही अनावश्यक खर्चही होऊ शकतात. मनामधील अनेक विचार त्रासदायक ठरू शकतात.

कौटुंबिक समारंभ, जबाबदाऱ्या यासाठी खर्चाची तरतूद करावी. संतती व जोडीदाराचे हट्ट पूर्ण कराल. तुमचाही मौजमजेकडे कल राहील. घरातील ज्येष्ठांकडे लक्ष द्यावे. वाणीवर नियंत्रण ठेवा. प्रवासाचे योग आहेत.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन संधीचे स्वागत करताना सत्यता तपासून पहावी. अनुभवी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा. आक्रमक वृत्ती नियंत्रणात ठेवा. संयमित नेतृत्वकौशल्य उपयोगी पडेल. आर्थिक गुंतवणूक करताना फक्त तात्कालीक फायदा न बघता दूरगामी परिणामांचा विचार करा. नोकरदारांचे श्रम वाढतील.

**शुभ दिनांक :** १, ७.

## वृश्चिक

**आठवड्याची** सुरुवात धावपळीने होईल. महत्त्वाची कामे आठवड्याच्या मध्यावर करा. अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागणार आहे. अत्यंत स्थिर मनाने व सावधगिरीने निर्णय घ्यावेत. अतिउत्साह, अति धाडस त्रासदायक ठरेल. आर्थिक आवक सर्वसाधारण चांगली राहील. पैसे अडकून राहणार नाही याची काळजी घ्या.

कुटुंबामध्ये प्रयत्नपूर्वक चांगले वातावरण ठेवावे लागेल. आक्रमक वृत्ती, गैरसमज टाळावे. घाईगडबडीत कुठलेही निर्णय घेऊ नये. कार्यक्षेत्रात लक्ष देताना घराकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. तुम्हाला पुढाकार घेऊन, सगळ्यांना बरोबर घेऊन काही निर्णय घ्यावे लागतील. गृहसजावट, नूतनीकरण याबाबत चर्चा होईल. कार्यक्षेत्रामध्ये पुरेसे भांडवल उभे करताना त्रास होईल. त्यामुळे तुमच्या नवीन, धाडसी योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी विलंब होऊ शकतो. स्वतःची प्रतिष्ठा सांभाळा. निर्णय चुकीचा होणार नाही याबाबत सावधगिरी बाळगा. अनुभवी तज्ञांचा सल्ला व पूर्वानुभव लक्षात घेऊन नियोजन करा. हितशत्रू व स्पर्धक सक्रिय होणार आहेत. संयम ठेवावा लागेल.

**शुभ दिनांक :** ५, ६.

## धनु

**आठवड्याचा** उत्तरार्ध महत्त्वाच्या कामांसाठी योग्य ठरेल. पूर्वार्धात अडथळ्यांचा सामना करावा लागेल. पराक्रमस्थानी असलेले ग्रह तुम्हाला स्वस्थ बसू देणार नाहीत. नवीन संधी लाभदायक ठरतील. अचानक धनलाभ होईल. बचतीचे नवीन मार्ग शोधावेत. खर्च योग्य ठिकाणीच होईल याकडे लक्ष द्या. प्रवासाचे योग आहेत मात्र त्यात अनपेक्षित अडचणी येऊ शकतात. कागदपत्रे सांभाळा.

कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढणार आहेत. घरातील रखडलेली कामे पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या आरोग्याची काळजी राहील. मुले, जोडीदार यांच्याशी सुसंवाद ठेवा. अविवाहितांच्या विवाहाची बोलणी पुढे सरकतील. कार्यक्षेत्रामध्ये नियोजित कामे वेळेत पूर्ण होतील. कामाचा भार वाढला तरी चुका होणार नाही यासाठी काळजी घ्या. छुपे विरोधक निष्क्रिय होतील. तुमच्या नियोजनबद्ध कृतीमुळे यश मिळेल. तुमची क्षमता व नेतृत्व कौशल्य सिद्ध होईल. कार्यपद्धतीचे कौतुक झाल्यामुळे समाधान मिळेल. नोकरदारांनी नियम पाळून काम करावे.

**शुभ दिनांक :** ५, ६, ७.

## मकर

**आठवड्याची** सुरुवात व अखेर कार्याला गती देणारी असेल. मधल्या काळात अडथळ्यांचा सामना करावा लागेल. आर्थिक व्यवहारात फसगत होणार नाही यासाठी सतर्क रहावे. संयम व सातत्य ठेवून नियोजित काम वेळेत पूर्ण करावे. बोलताना शब्द जपून वापरा. निर्णय घेताना मनात गोंधळ होऊ शकतो म्हणून विश्वासू व्यक्तीचा सल्ला जरूर घ्यावा.

कुटुंबासाठी अनपेक्षित अचानक खर्च करावा लागेल. विनाकारण गैरसमज होऊ शकतात. विशेषतः भावंडे व संततीशी सुसंवाद ठेवा. जोडीदाराशी मतभेद कमी होतील. आई-वडिलांची काळजी घ्यावी. कार्यक्षेत्रामध्ये झटपट लाभासाठी नियमभंग करू नये. मोहजालापासून लांब राहा. वरिष्ठ, सहकारी यांच्यावर अवलंबून राहू नका. परिस्थितीनुसार व्यावसायिकांना धोरण, कार्यपद्धती बदलावी लागेल.

भावनेच्या भरात निर्णय घेणे टाळावे. कायदेशीर बाबी तपासल्याशिवाय नवीन व्यवहार टाळा. आधी केलेल्या चुका उघडकीस येऊ शकतात.

**शुभ दिनांक :** १, ७.

## कुंभ

**आठवड्याचा** पूर्वार्ध महत्त्वाची कामांसाठी योग्य आहे. तुमच्या राशीत अनेक महत्त्वाचे ग्रह सध्या एकत्र आहेत. कामाचे योग्य नियोजन व योग्य वेळेत काम पूर्ण करणे याला महत्त्व द्यावे. सर्वांना बरोबर घेऊन जाणारी तुमची रास आहे परंतु सध्या आंधळा विश्वास त्रासदायक ठरेल. सावधगिरी बाळगणे योग्य ठरेल. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी गुरुची अनुकूलता उपयोगी ठरेल. आर्थिक आवक चांगली राहील. खर्चावर मात्र नियंत्रण ठेवा. जुनी येणी वसूल होतील.

कौटुंबिक आघाडी मनस्वास्थ्य बिघडवू शकते. उत्साही व सकारात्मक मानसिकता ठेवून अडचणीतून मार्ग काढता येतील. जबाबदारी टाळता येणार नाही. मित्रपरिवाराची मदत होईल.

कार्यक्षेत्रामध्ये पूर्ण माहिती घेतल्याशिवाय नवीन व्यवहार, निर्णय घेऊ नका. प्रवासाचे योग आहेत. छुपे शत्रु ओळखून तुमचे डावपेच आखावे लागतील. विशेषतः नोकरदारांनी जास्त सतर्क रहावे. व्यावसायिकांनी अति धाडस करू नये. नेतृत्वकौशल्य लाभदायक ठरेल. प्रयत्नांमध्ये वाढ करावी लागेल. मानसिक आरोग्याकडे लक्ष द्या.

**शुभ दिनांक :** १, ७.

## मीन

**आठवड्याचा** मध्य अनेक घडामोडींचा राहील. सुरुवातीला व अखेरीस जाणवणारे अडथळे योग्य प्रयत्नाने दूर करता येतील. निराश न होता, सकारात्मक दृष्टिकोन ठेवूनच समोर येणाऱ्या आव्हानांना तोंड देता येईल. कुंभ राशीत असणारे अनेक ग्रह प्रतिकूलता वाढवणार आहेत. आर्थिक अंदाज चुकू शकतील. मोठी गुंतवणूक पुढे ढकलावी. आत्मविश्वास व उत्साह कायम ठेवा.

कौटुंबिक सदस्यांशी जुळवून घेणे योग्य ठरेल. संततीसाठी तुम्हाला मार्गदर्शकाची भूमिका घ्यावी लागेल. जोडीदार व इतर कौटुंबिक सदस्यांवर अवलंबून राहता येणार नाही. वडिलांचा सल्ला, मदत मिळेल.

उद्योग व्यवसायात भावनिक निर्णय टाळावेत. व्यावहारिक बाजूकडे दुर्लक्ष करू नये. मनाची संभ्रमावस्था निर्णय घेताना त्रासदायक ठरेल. विश्वासू व अनुभवी व्यक्तीचा सल्ला, मदत घ्यावी. नोकरदारांनी अलिप्त धोरण ठेवून स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करावे. व्यावसायिकांनी बदलत्या परिस्थितीचा अंदाजे घ्यावा. अनुकूल गुरुमुळे तुमच्या श्रमाला, प्रयत्नांना यश मिळेल.

शुभ दिनांक : ५, ६.

- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे

नवाकाळ

• मुंबई । रविवार १ मार्च, २०२६ • पान -८

## उत्तर प्रदेशच्या सरकारी कर्मचाऱ्यांना होळीची तीन दिवस भरपगारी सुट्टी



**लखनौ -** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी होळीनिमित्त मोठी भेट दिली आहे. योगी सरकारने होळीच्या सणाचा आनंद घेण्यासाठी तीन दिवसांची भरपगारी सुट्टी जाहीर केली आहे. एवढेच नव्हे तर होळीचा सण कर्मचाऱ्यांना दणक्यात साजरा करता यावा यासाठी फेब्रुवारी महिन्याचे वेतन होळीच्या आधी देण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत. २ मार्च रोजी होलिका दहन होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ३ मार्च रोजी रंगपंचमी साजरी केली जाणार आहे. त्यामुळे योगी सरकारने २ ते ४ मार्च असे तीन दिवस राज्य सरकारच्या सर्व कार्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. नेमका १ मार्च रोजी रविवार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना सलग चार दिवस सुट्टीचा आनंद उपभोगता येणार आहे.

# आखातातील ८ देशांतील अमेरिकी तळांवर हल्ले



पान १ वरून

देशांनी आपापली हवाई क्षेत्रे बंद केली. इस्त्रायलच्या तेल अविव शहरातील बेन गुरियन विमानतळ बंद करण्यात आले.

इराणविरुद्धच्या युद्धात अमेरिकेने टॉमहॉक क्षेपणास्त्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. सुमारे ५०० टॉमहॉक क्षेपणास्त्रे अमेरिकेने युद्धात उतरवली. हे युद्ध सुरू होण्यापूर्वीच अमेरिकेने तयारी करीत इस्त्रायलच्या उत्तरेकडे यूएसएस जेराल्ड, यूएसएस लिंकन ही लढाऊ विमाने तैनात केली होती.

कोणत्याही परिस्थितीत इराणचा अण्वस्त्र निर्मितीचा कार्यक्रम उद्ध्वस्त करणे, तेथील आयातुल्लाह खोमेनी यांची धर्माधिष्ठीत सत्ता उलथून लावणे आणि इराणमध्ये अमेरिकाधार्जिणे सरकार आणणे या प्रमुख उद्देशाने अमेरिकेने आज हे इराणविरुद्ध युद्ध छेडले. यासंदर्भात इराण आणि अमेरिका यांच्यादरम्यान चर्चेच्या तीन फेऱ्या झाल्या होत्या. मात्र इराण अणुशक्ती निर्मितीच्या आपल्या भूमिकेवर ठाम राहिला. त्यामुळे युद्ध अटळ आहे असे संकेत आधीच मिळाले होते. युद्ध सुरू होताच काही वेळाने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाला संबोधित केले. इराण हा दहशतवादी देश असून, या दहशतवादी देशाला कदापि अण्वस्त्र निर्मिती करू देणार नाही, इराणचे नौदल आम्ही नष्ट करू, असा इशारा ट्रम्प यांनी दिला. इराणविरूद्ध आपण ऑपरेशन एपिक फ्युरी सुरू केल्याची घोषणाही ट्रम्प यांनी केली. इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहु यांनी अमेरिकेचे जाहीर आभार मानले.

**ट्रम्प यांचा खरा चेहरा समोर आला**

अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यानंतर काही वेळातच रशियाच्या वतीने प्रतिक्रिया देण्यात आली. त्यातून ट्रम्प यांच्यावर जळजळीत टीका करण्यात आली. स्वतःला शांतिदूत म्हणवून घेणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांचा खरा चेहरा समोर आला आहे, असे रशियाने म्हटले. इराणवरील हल्ल्याचा रशियाने निषेध केला. मात्र या हल्ल्यात रशिया उघडपणे कोणतीही भूमिका घेण्याची शक्यता नाही. याचे कारण युक्रेन विरोधातील त्यांच्या युद्धात रशियालाच अमेरिकेची मदत लागणार आहे. हे युद्ध छेडल्यानंतर संयुक्त राष्ट्राने लगेच आपली प्रतिक्रिया दिली नाही. तर इराणने म्हटले की हे युद्ध छेडल्याचा अमेरिका व इस्त्रायलला पश्चाताप होईल. यामुळे हे युद्ध दिर्घकाळ चालेल हे निश्चित आहे.

**भारतीय विद्यार्थ्यांची मदतीची याचना**


युद्ध सुरू होताच इराण व इस्त्रायलने आपले हवाई क्षेत्र बंद केले. अन्य देशांनीदेखील या दोन्ही राष्ट्रांकडे जाणारी विमाने रद्द केली. त्यामुळे येथे शिक्षण घेत असलेले लाखो विद्यार्थी व नोकरदार, व्यावसायिक सध्या तिथेच अडकून पडले आहेत. कसेही करून मायदेशी परतण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी भारत सरकारकडे ते मदतीची याचना करत आहेत. एका भारतीय विद्यार्थिनीचा एक व्हिडिओ आज समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. या व्हिडिओमध्ये तेहरान शहरात तोंडाला मास्क लावलेली विद्यार्थिनी भारत सरकारकडे मदतीची याचना करताना दिसत आहे. अबूधाबीचे विमानतळ, दुबईचा प्रसिध्द मरिना बीच येथेही हल्ला झाला. या हल्ल्यात एक भारतीय ठार झाल्याचे सांगण्यात येते, पण त्याचा तपशील मिळालेला नाही.

**अबू धाबीत मंदिर बंद**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या सूचनेनुसार आणि सध्याच्या आणीबाणीच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अबूधाबी येथील बीएपीएस स्वामीनारायण हिंदू मंदिर खबरदारीच्या दृष्टीने बंद ठेवण्यात आले आहे. भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत प्रशासनाच्या मार्गदर्शनानुसार हा निर्णय घेतला आहे. मंदिर प्रशासनाने स्पष्ट केले की, परिस्थितीनुसार पुढील अपडेट्स दिल्या जातील आणि मंदिराचे कामकाज पुन्हा सुरू होण्याबाबत सूचना वेळोवेळी दिल्या जातील.



**जम्मू आणि काश्मीर - बडगाम परिसरात शिया मुस्लिमांनी इराणच्या समर्थनार्थ निदर्शने केली. त्यांनी इराणवरील हल्ल्याबद्दल अमेरिका आणि इस्त्रायलचा निषेध केला.**



तेहरानमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थिनीने व्हिडिओ जारी करून सरकारकडे मदतीची मागणी केली.

## एअर इंडियाची उड्डाणे स्थगित

इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे संपूर्ण आखाती प्रदेशात तणाव वाढला आहे. अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आल्याने प्रादेशिक सुरक्षा अधिक गंभीर बनली असून, दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्र हल्ले होत आहेत. हा संभाव्य धोका लक्षात घेऊन एअर इंडियाने आखाती देशांकडे जाणारी सर्व उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले. तसेच प्रवाशांसाठी मार्गदर्शक सूचनादेखील जारी करण्यात आल्या आहेत. कंपनीने सांगितले की, परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय वेळोवेळी जाहीर केला जाईल.

## राहुल गांधींचे भारतीयांच्या सुरक्षेसाठी सरकारला आवाहन

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकारकडे आवाहन केले. त्यांनी म्हटले की, अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील वेगाने वाढत असलेले शत्रुत्व अत्यंत चिंताजनक आहे. मध्य पूर्वेतील प्रत्येक भारतीय नागरिकाची सुरक्षा ही आपली सर्वोच्च प्राथमिकता असावी. मी भारत सरकारकडे त्वरित आणि सक्रिय उपाययोजना करण्याचे आवाहन करतो.

# राजाश्रय कुणाला? कराडच्या मुलाची दुसरी फेसबुक पोस्ट

■ बीड

**मस्साजोगचे** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड यांचा मुलगा सुशील कराड याने आज आणखी एक फेसबुक पोस्ट करत खळबळ उडवली आहे. आपल्या नव्या पोस्टमध्ये त्याने राजाश्रय कुणाला (आम्हा/तुम्हा) असा प्रश्न उपस्थित केला आहे. या पोस्टनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

सुशील कराडने कालही फेसबुकवर पोस्ट करत आता सर्वांसमोर सर्व काही बोलणार, असा इशारा दिला होता. त्यानंतर आजची पोस्ट समोर आल्याने प्रकरण अधिकच चर्चेत आले आहे. परळी येथील व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणानंतर वाल्मिक कराड आणि त्यांचा मुलगा सुशील यांची नावे पुढे आली होती.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## मेट्रो दुर्घटनेप्रकरणी हायकोर्टात याचिका

■ मुंबई

**मुलुंडमध्ये** १४ फेब्रुवारी रोजी निर्माणाधीन मेट्रोचा स्लॅब कोसळून झालेल्या भीषण अपघातानंतर आता हा मुद्दा न्यायालयात पोहोचला आहे. या प्रकरणी सर्व बांधकामाधीन मेट्रो मार्गिकांचे संरचनात्मक सुरक्षा लेखापरीक्षण करण्याची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. ही याचिका ॲड. रुजू ठक्कर यांनी दाखल केली आहे.

# ५ मार्चपासून मालवाहतूकदारांचा संपाचा इशारा

**नवी मुंबई -** राज्यातील १५ लाख मालवाहतूकदारांनी ई-चलन प्रणालीविरोधात ५ मार्चपासून बेमुदत संपावर जात चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला. या आंदोलनात ट्रक, टेम्पो, खासगी वाहतूक कंपन्या रिक्षा टॅक्सी, शालेय बस सहभागी होणार आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र ठप्प होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महाराष्ट्र वाहतूकदार कृती समितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक नवी मुंबईतील एपीएमसी येथील माथाडी भवनात पार पडली. त्यात ५ मार्चपासून संपावर जाण्याचा निर्णय घेतला.


# शरद पवार यांच्या मुंबईतील घराचा पुनर्विकास लोढा करणार

■ मुंबई

**मुंबईतील** उच्चभ्रूंच्या मलबार हिल आणि कंबाला हिल येथील १७ हजार ४०३.२० चौरस मीटर भूखंडाचा पुनर्विकास करण्याचे हक्क मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड (पूर्वाश्रमीची लोढा बिल्डर्स लिमिटेड) या कंपनीने मिळवले आहेत. विशेष म्हणजे याच भूखंडावर राज्यातील धुरंधर राजकारणी शरद पवार यांचे सिल्व्हर ओक हे खासगी निवासस्थान आहे.

मलबार हिल परिसर हा मुंबईतील अत्यंत महागड्या ठिकाणांपैकी एक आहे. या परिसरातील विकासकामाचे हक्क लोढांनी मिळवल्याने बांधकाम क्षेत्रात ही लक्षणीय घडामोड मानली जात आहे. कांगा चॅरिटेबल ट्रस्ट आणि लोढा डेव्हलपर्स यांच्यामध्ये विकास हक्क विक्रीचा करार झाला.


**हरवले आहेत**



**श्री. नारायण राजाराम सावंत**
हे दिनांक १६/०६/२०१० रोजी आपल्या राहत्या घरातून जिजामाता नगर, काळाचौकी, मुंबई ४०००३३ येथून हरवले आहेत.
तरी कोणास सापडल्यास खालील दिलेल्या नंबरवर संपर्क करावा.
अक्षता पोमेंडकर ९१६७५४८३४८



